
सूरज गाताडे
एजंट एक्स
X
मि.वाघ
कथा


मिस्टर वाघ
परत आलाय

# एजंट -एक्स

# हे पुस्तक विनामूल्य आहे

# पण फ़ुकट नाही

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे प्रकाशन कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे.  प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# एजंट -एक्स

सूरज काशिनाथ गाताडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# एजंट-एक्स

सूरज काशिनाथ गाताडे
स्क्रिन रायटर्स सोसिएशन मेम्बरशीप नंबर - २१८३१
रा. पेठ वडगांव, ता. हातकणंगले, जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६ ११२
ई-मेल आडी - surajgatade26@gmail.com
मोबाईल व व्हॉट्सऍप - 9890137797
फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140
इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

**e**sahity@gmail. com

**e**Sahity Pratishthan

**e**leventh floor

**e**ternity

**e**astern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

App : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.

प्रकाशन : ८ ऑगस्ट २०१९



©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .

# "AGENT - X."

## (अ मिस्टर वाघ स्टोरी)

लेखक - सूरज काशिनाथ गाताडे.

स्क्रिन रायटर्स असोसिएशन नंबर - 21831

# प्रस्तावना -




नमस्कार, हे माझे आठवे पुस्तक आणि ही मिस्टर वाघ सिरीजची चवथी कथा. आशा आहे ही कथासुद्धा आपल्याला आवडेल. आपल्या प्रतिक्रिया नक्की कळवा. काही चुका आढळल्या तर तेही सांगा म्हणजे पुढं मला सुधारणा करता येतील. मी प्रत्येक पुस्तकात आधीच्या पुस्तकाहून सुधारणा करण्याचा प्रयत्न करत असतो. आपण कथेचा आनंद घ्याल अशी आशा करतो...

तसेच नेहमीच मोलाची साथ दिल्याबद्दल सुनीळ सामंत सर आणि ई - साहित्य टीमचे अनेक आभार.

धन्यवाद...!


सूरज काशिनाथ गाताडे.
पत्ता - चिंगळे गल्ली, पेठ वडगांव, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६ ११२
ई-मेल आडी - surajgatade26@gmail.com
मोबाईल व व्हॉट्सऍप - 9890137797
फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140
इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26

# पूर्वप्रकाशित पुस्तके




१) [द डेथ ऑफ लिंकन्स् मदर (सायंटिफिक क्राईम थ्रिलर)](http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_of_lincolns_mother_suraj_gatade.pdf)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_of_lincolns_mother_suraj_gatade.pdf




२) [डेथ विल (मिस्टर वाघची पहिली कथा - सायंटिफिक सायकॉलॉजिकल क्राइम थ्रिलर)](http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_will_suraj_gatade.pdf)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_will_suraj_gatade.pdf





३) [दे किस्ड् बाय मिस्टेक (रोमँटिक कॉमेडी/ट्रॅजेडी)](http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kiss_surajgatade.pdf)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kiss_surajgatade.pdf

४) [द पॅरासाइट (सायन्स फिक्शन)]

[http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/parasite_suraj_gatade.pdf]





५) [फ्लेम (म्युसिकल - फॅन्टसी/सायकॉलॉजिकल/ट्रॅजेडी/लव स्टोरी या चार विविध कथा प्रकारांचा कथा संग्रह)]

[http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/flame_suraj_gatade.pdf]




६) [अ हेवी प्राईझ् - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)]

[http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ahp_suraj_gatade.pdf]




७) [डेडली मिटिंग्स् - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)]

[http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/deadly_meeting_wagh_suraj_gatade.pdf]



**प्रस्तुत कथा, ईसाहित्य प्रतिष्ठान टीम व वाचकांना समर्पित -**



# एजंट एक्स



# १.

साई हॉस्पिटल, स्पेशल वॉर्ड - एक वीस-बावीस वर्षांची मुलगी बेडवर पडून होती. आणि मी आणि मिस्टर वाघ तिच्यासमोर उभे होतो. 'सिस्टिक फायबरोसिस' नांवाच्या आजाराने ती ग्रस्त होती. असह्य त्रास असून देखील तिच्या चेहऱ्यावरचं हसू ढळलेलं नव्हतं.

तिच्याकडं पाहत असताना मला एक गोष्ट जाणवली, की ज्या अर्थी मिस्टर वाघ मला या मुलीला भेटवायला घेऊन आला आहे, त्या अर्थी तो पुढं जे काही सांगणार आहे, ते याच मुलीशी संबंधित आहे.

तिला 'बाय' करून मिस्टर वाघ वॉर्डच्या बाहेर पडला. माझ्यासाठी ती मुलगी एक तर अनोळखी होती. तशात तिची ही अशी अवस्था पाहून काय प्रतिक्रिया द्यावी हे मला कळत नसल्यानं मी काहीच न बोलता मिस्टर वाघच्या मागून बाहेर पडलो. पण तिच्या नजरेत माझ्यासाठी खूप आपुलकी मात्र जाणवली मला...

स्वतः सर्वांत अधिक दुःखात असलेली माणसं दुसऱ्यांसाठी खूप प्रेमळ असतात याची प्रचिती मला तिच्या नजरेनं लक्षात आणून दिली.

मिस्टर वाघच्या कस्टमाईज्ड् '69 फोर्ड मस्टँग' मधून आम्ही प्रवास करत होतो. मी त्याला रेकमेंड केलेली जॉन विक फिल्म पाहून चार महिन्यांपूर्वी त्यानं ती अमेरिकेहून इम्पोर्ट केली होती.

(ॲक्शन फिल्म्सचा तो मोठा चाहता आहे. पण वेळ नसल्यानं त्याला फिल्म्स फॉलो करता येत नाहीत. म्हणून मग तोच कधीतरी वेळ असेल त्यावेळी माझ्याकडून काही फिल्म्स घेतो. असो...)

रस्ताभर मिस्टर वाघ काहीच बोलला नाही. आम्ही त्याच्या घरी आलो. मला माझ्या घरी न सोडता तो तसाच त्याच्या घरी मला घेऊन आला होता. काही क्षणांसाठी वाटलं होतं, की मी सोबत आहे हे तो विसरालाय की काय?

पण नाही! तो मुद्दामच मला त्याच्या घरी घेऊन आला होता. कारण त्याचं कन्फेशन अजून बाकी होतं. म्हणून मला त्यानं घरी जाऊ दिलं नव्हतं.

बाकी याच्या घरात येणं मला अजिबात पसंत नाही. याचं घर म्हणजे भीतीचं माहेर घर! पण स्टेअरिंग त्याच्या हातात होतं आणि शिवाय मला फोर व्हिलर येत नाही. त्यामुळं त्याच्या सोबत त्याच्या घरी येणं मला भाग होतं.

मला आणि त्याला चहा करून तो घेऊन आला. काही सांगायचं असलं, की त्याची सुरुवात ही अशी होते. मिस्टर वाघच्या हातच्या चहाने...

"आपण भेटलो, ती मुलगी कोण माहितेय?" मिस्टर वाघनं चहाचा घोट घेत मला विचारलं.

"हानिया अमीर! त्यांच्या हेल्थ रिपोर्टवर वाचलं." मी उत्तरलो.

"अनादर ब्रेव्ह गर्ल दॅट आय हॅव मेट रिसेंटली! म्हणून म्हंटलं तुझी पण तिच्याशी भेट घालून द्यावी!" तो म्हणाला.

त्यानं असं म्हंटल्यांनंतर मला लगेच ऋतुजा, एलिस व अनुषा यांची आठवण झाली. पण त्या प्रकरणांत पुढं काय झालं ते मिस्टर वाघ मला सांगणार नाही हे मी जाणून होतो. कारण जे काही सांगायचं होतं ते त्यानं आधीच कन्फेस केलं होतं. त्यामुळे ते विषय संपले होते. त्यामुळं त्या

संदर्भात पुढं तो काहीच सांगणार नव्हता. आणि आता वेळ आली होती नवीन घटना उलगडण्याची...

"त्यांना झालेला आजार...?" मी वाक्य पूर्ण केलं नाही.

कसं आणि काय विचारावं हे मला समजत नव्हतं. पुढं काय वाढून ठेवलंय हेच सतत डोक्यात घुमत होतं... शिवाय हा आजार कधी न पाहिलेला, कधी न ऐकलेला...

"सिस्टिक फायबरोसिस! वाचले असशीलच तिच्या रिपोर्टवर!" तो म्हणाला.

"हो पण नेमकं काय ते काही नाही कळालं." मी स्पष्ट केलं.

"सिस्टिक फायबरोसिस", मिस्टर वाघने सांगण्यास सुरवात केली... "हा एक अनुवांशिक आजार आहे, पण वर्षभरात 10 लाखापेक्षाही कमी केसेस भारतात आढळतात. हा आजार फुफ्फुस, पचनसंस्था, यकृत, स्वादुपिंड, मूत्रपिंड यांना इफेक्ट् करतो. मोस्टली फुफ्फुसांवर इफेक्ट् करत असल्यानं ब्रिदिंग प्रॉब्लेम होतो. सतत बडगा उत्पन्न होतो आणि यामुळं फुफ्फुसांत इन्फेक्शन होत राहतं. योग्य आहार आणि अँटीबायोटिक्सनं याला कंट्रोल करता येतं, पण हा आजार कधीच बरा न होणारा आहे आणि याच्या ट्रिटमेंटचा खर्च न परवडणारा... पूर्वी सिस्टिक फायबरोसिसचे रुग्ण जास्त काळ जगत नसत, पण आता प्रॉपर ट्रीटमेंटनं व मेडिकेशनमुळं लाईफ स्पॅन वाढलाय. आता हे रुग्ण तीस - चाळीस वर्षांपर्यंत जगू शकतात."

मिस्टर वाघचं शेवटचं वाक्य ऐकून मी सुन्न झालो. कारण हानियाचं वय स्पेसिफिक्ली बावीस वर्ष आहे. म्हणजे... म्हणजे ती फार तर अजून आठ ते अठरा वर्षच जगू शकते.

बघायला गेलं, तर हा टाईम स्पॅनही तसा मोठा आहे. पण, मरण म्हंटलं, की माणूस कितीही वर्ष जगू द्या... जीवन कमीच वाटतं...

त्यामुळं मला तिचा मृत्यू जवळ दिसत होता आणि कदाचित तेही त्या हॉस्पिटलच्या बेडवरच... कारण तिला स्वतःचं असं काळजी घेणारं कोणीच नाही...

"मग तिच्या घरच्यांचं काय? तिला कोणीच नाही?" मी मिस्टर वाघला विचारलं.

"नाही!" तो एवढंच म्हणाला. आणि त्यानं आपला नवीन अनुभव सांगायला सुरुवात केली...

# २.

इन्स्पेक्टर मिलींद हजारेनं त्याच्या केबिनमध्ये येऊन आपली टोपी व काठी वैतागानं टेबलवर आदळली आणि त्यानं आपल्या खुर्चीत स्वतःला झोकून दिलं.

"सातवा खून!" घाम पुसत तो समोर बसलेल्या मिस्टर वाघला म्हणाला.

मिस्टर वाघ हजारे येण्याअगोदर एक अर्धा तास आधी येऊन मस्तपैकी कांदाभजी आणि चहाचा आस्वाद घेत बसला होता.

"सिरीयल किलर?" तोंडातली भजी चावत आणि चहाचा घुटका घेत त्यानं हजारेला विचारलं.

"वाटतंय तसंच. पण प्रत्येक खुनाचा पॅटर्न वेगळा आहे. म्हणून एकाच व्यक्तीनं सगळे खून केलेत असं समोर प्रथमदर्शनी तरी वाटत नाही, पण एकाच शहरात सलग खून होतायत म्हंटल्यावर ते कोणीतरी एकटाच किंवा एक टोळी करते आहे असंच वाटतं...!"

"कन्फ्युजिंग! हं?"

"येस!"

"मी तुमचं कन्फ्युजन दूर करतो! हे कोणीतरी एकच व्यक्ती करतीये!" म्हणत मिस्टर वाघनं चहाचा घोट घेतला.

"कशावरून?" हजारेनं सावध होत विचारलं.

"खून करण्याचे प्रकार वेगळे असले, तरी सर्वांना निर्घृणपणे मारण्यात आलंय! हा मुख्य धागा विसरताय तुम्ही!"

"एक्सलेंट! तुम्ही माहिती ठेवलीय म्हणायची तर याची!" हजारे खूष होत म्हणाला.

"माझी नजर सगळ्यांवर असते हजारे!" बेरकी नजर हजारेवर ठेवून मिस्टर वाघ त्याला म्हणाला.

"म्हणूनच हे प्रकरण हाताळण्यासाठी तुम्ही योग्य आहात! माझी खात्री होती. म्हणूनच तुम्हाला बोलावलंय."

"मी काय करू शकतो यात?" मिस्टर वाघनं त्याला विचारलं.

"मी तुम्हाला हायर करतोय ही केस सॉल्व्ह करण्यासाठी?!"

"म्हणजे काम मी करणार आणि वाहवा तुम्ही लुटणार?! माझा काय फायदा?" मिस्टर वाघनं दुसरी भजी उचलली.

"मी पे करीन तुम्हाला."

"असं?" मिस्टर वाघनं उपहासानं उच्चारलं,

"माझ्या फीचा अंदाज नाही बहुतेक तुम्हाला!" तो बोलला.

"तुम्ही बोला." हजारेनं ऑफर दिली.

हजारेच्या या बोलण्यावर मिस्टर वाघ हसला.

"सात खुनांमध्ये धन्वंतरी फार्मास्युटीकल कंपनीचे दोन बोर्ड मेंबर्स आहेत. एक सबइन्स्पेक्टर, एक पोलीस प्रोसिक्युटर, एक जर्नलिस्ट, आणि दोन सामान्य नागरिक मेलेत. म्हणजे ही एक हाय प्रोफाइल केस आहे. परहेड वीस लाखच्या हिशोबाने... एक कोटी चाळीस लाख आत्ताच झाले. आणि मी हे सरासरी धरतोय. नाही तर मी मृत व्यक्तीच्या स्टेटस प्रमाणं पैसे आकारतो. पण तुमच्यासाठी थोडं कन्सेशन. पुढे जर आणखी कोणी मेले, तर ती फी वेगळी. आणि गुन्हेगारासाठी पन्नास लाख वेगळे. एक पेक्षा जास्त असतील, तर परहेड पन्नास! जमेल?"

"हो!" क्षणाचाही वेळ न दवडता हजारे बोलून गेला.

तसा मिस्टर वाघ भजी चखळण्याचं थांबला आणि त्यानं रोखून हजारेकडं पाहिलं आणि दुसऱ्याच क्षणी हसू त्याच्या चेहऱ्यावर तरळलं.

"खूप माल दाबलेला दिसतोय!" तो म्हणाला.

"त्याच्याशी तुम्हाला कर्तव्य नाही. तुमचं काम होतंय हे महत्त्वाचं!" हजारे स्मित करत मिस्टर वाघला म्हणाला.

मिस्टर वाघनं ब्रॉड स्माईल केलं आणि हस्तांदोलन करण्यासाठी हात पुढं केला. हजारेनं विचार न करता लगेच हात मिळवला. आणि त्याच्या लक्षात आलं, की मिस्टर वाघचा हात तेलकट आहे. त्यानं हात बाजूला घेत रूमालाला आपला हात पुसला.

"जेव्हा आता आपण मित्र झालो आहोत, तर एक विचारू? चालेल?" चहाचा घोट घेत मिस्टर वाघनं हजारेला विचारलं.

"हो!"

"यात तुमचा फायदा काय?" मिस्टर वाघनं हजारेची संमती मिळताच प्रश्न केला.

"प्रमोशन!" हजारे खूष होत म्हणाला.

"म्हणजे अजून माल ओढायला मोकळे. आता खोऱ्याने ओढताय. नंतर मग काय जेसीबीच! म्हणूनच एवढे पैसे खर्च करायला तुम्ही तयार आहात!" मिस्टर वाघनं टोला त्याला लगावला.

मिस्टर वाघच्या या टिप्पणीवर हजारे जरा नाराज झाल्यासारखा वाटला.

"आय लाईक इट! तुम्ही खूप चांगली डील करताय. तुम्हाला माहिती आहे, माणूस चुकतो कुठं? तो रिस्क घेत नाही. अहो पण रिस्क घेतल्याशिवाय मोठं होता येत नाही हे लोकांना कळत

नाही. तुम्हाला ते कळलंय. आय लाईक इट! आय रियली लाईक इट!" हजारेची नाराजी दूर करण्यासाठी मिस्टर वाघ म्हणाला.

मिस्टर वाघ असं बोलल्यानंतर हजारेच्या चेहऱ्यावरील भाव निवळले व तो पुन्हा नॉर्मल झाला. त्यानं केस फाईल व आतापर्यंत झालेल्या तपासाचा रिपोर्ट मिस्टर वाघसमोर ठेवला. मिस्टर वाघ तेलकट हातानेच ते चाळू लागला.

"पुढं?" हजारेनं विचारलं.

"समोसा, कचोरी मागवा! भजीनं पोट नाही भरलं." मिस्टर वाघ म्हणाला.

यावर हजारे मिस्टर वाघकडे पाहतच राहिला.

"काय?" मिस्टर वाघने काही समजले नाही अशा अविर्भावात विचारलं. म्हणाला, "तुम्ही बोलावल्यावर नाश्ता न करताच आलोय... दुपार झालीये, पण इथं जेवणार कसं ना? म्हणून म्हंटलं नाश्ताच करावा..."

मिस्टर वाघच्या बोलण्यावर हजारे थोडा रागावून त्याच्याकडे पाहू लागला.

"मिस्टर! रागावू नका. जेवायला पुन्हा कधी तरी येईन...!" मिस्टर वाघनं त्याला अजूनच चिडवलं.

मिस्टर वाघच्या या बोलण्यावर हजारे खवळलाच. असं असून मिस्टर वाघला त्याला नाराज करायचं नव्हतं. म्हणून त्यांनं आपला राग आवरण्याचा नाकाम प्रयत्न केला.

पण त्याला जी गोष्ट माहीत नव्हती, ती मला माहित आहे. मिस्टर वाघनं त्याला जेवणाचं दिलेलं वचन तो नक्की पूर्ण करणार! इन्स्पेक्टर मिलींद हजारेच्या तेराव्याचं जेवण जेवून...!

बोट दिलं, तर हा हातच खेचतोय असं पुटपुटत त्यानं हवालदाराला बोलावण्यासाठी रिंग दिली.

"सॉरी टू से, पण तुमच्या पोलीस स्टेशन कँटीनचं खाणं बकवास आहे. समोरच्या स्वीट मार्ट मधून मागवता येईल तर बघा..."

हवालदाराने आत येऊन सल्युट ठोकला.

"नारायण स्वीट मार्ट मधनं समोसा, कचोरी घेऊन या!"

हजारे बोलत असताना रागानं त्याच्या कानशीलावरील तट्ट फुगलेली शीर उडताना मिस्टर वाघ पाहत होता आणि त्याला हसू रोखता येत नव्हतं.

"बिलाचं जरा..." मिस्टर वाघ लटक्या संकोचान म्हणाला.

"हो!" म्हणत हजारे जवळजवळ किंचाळलाचं!

खाऊन झाल्यावर जाताना हजारेच्या केबिन मधील हजारे व त्याच्यातील संवादाचं सीसीटीव्ही फुटेज डिलीट करायला हजारेला सांगायला मिस्टर वाघ विसरला नाही.

# ३.

आणखी एक मृत्यू झाला होता. धन्वंतरी फार्माचा तिसरा बोर्ड मेंबर, सत्तेचाळीस वर्षीय नारायण सांगावकर आपल्या लिविंगरूममध्ये विस्कटला होता.

हो. विस्कटला म्हणतोय; कारण त्याच्या शरीराच्या वरचा भाग कापून तुकडे करून लिविंगरूम भर विखुरले होते. मिस्टर वाघ त्या ठिकाणी पोहोचला.

तो येण्याआधी पंचनामा उरकून हजारेनं सर्वांना तेथून बाहेर काढलं होतं. मिस्टर वाघ या केसवर काम करतोय हे त्याला कोणालाही कळू द्यायचं नव्हतं. मिस्टर वाघनं बॉडी पाहिली. मृताचा गळा चिरण्यात आला होता.

"किचन नाईफ वापरलंय!" मिस्टर वाघ बॉडी एक्झामाईन करत मागेच उभ्या असलेल्या हजारेला म्हणाला.

"किचन मधला चाकू? कशावरून?" हजारेनं आश्चर्यानं विचारलं.

"बॉडीवरील कट बघा. खांद्यापासून वर चिरलंय. एखाद्या गाईला कापावं तसं. कुकिंगच्या भाषेत याला 'चक स्टेक कट' म्हणतात." मिस्टर वाघनं स्पष्टीकरण दिलं.

"म्हणजे... खुनी एक शेफ आहे...? किती निर्घृणपणे मारलंय..." हजारे विचारांच्या तंद्रीत बोलून गेला.

"सांभाळून राहा हं हजारे!" मिस्टर वाघच्या उच्चारांवर हजारे दचकून भानावर आला.

"हॅं! मी काही घाबरत नाही! जर खूनीने मला मारण्याचा प्रयत्न करण्याची चूक केली, तर तो मेलाच म्हणून समजा!"

"म्हणजे त्यावेळी तुम्हाला माझी गरज पडणार नाही. माझे पैसे द्याल ना पण?" मिस्टर वाघनं हजारेंच्या चेष्टा करण्यासाठी त्याला विचारलं.

हजारेनं मिस्टर वाघला काही उत्तर देण्याआधी मिस्टर वाघचं कशावर तरी लक्ष गेलं होतं आणि तो त्या दिशेने पळून देखील गेला होता. हे लक्षात येताच हजारे देखील त्याच्या मागून पळाला...

रस्त्यावर,

"काय झालं असं अचानक पळून का आलात?" हजारेनं दम खात विचारलं.

"दरवाज्यातून कोणी तरी पळून गेल्याचं दिसलं. आपल्यावर बहुतेक कोणीतरी पाळत ठेऊन आहे. किंवा तो खूनी देखील असू शकतो!" मिस्टर वाघनं उत्तर दिलं.

"शीट! हाताला लागला असता, तर आताच सोक्षमोक्ष झाला असता!" हजारे वैतागाने उद्गारला.

"तो लागेलच ओ! पण आणखी वीस लाख ऍड झाले ते मात्र विसरू नका!" म्हणत मिस्टर वाघनं हजारे काही बोलण्याची वाट न बघता आपला रस्ता धरला.

इकडे हजारे सुद्धा मिस्टर वाघला शिव्या घालत त्याच्या जीपपाशी गेला. आपण आपल्याच पायावर धोंडा मारून घेतलाय की काय असं त्याला वाटू लागलं...

मिस्टर वाघला जेव्हा असं वाटलं, की आता आपण हजारेच्या दृष्टिक्षेपातून दूर झालो आहोत, तेव्हा त्याच्या पायांना पुन्हा वेग आला.

तो त्याच दिशेनं धावला होता, ज्या दिशेने मघासची व्यक्ती धावली होती. एका अगदीच वर्दळ नसलेल्या अरूंद गल्लीत ती व्यक्ती एका काळया रेंज रोव्हरसमोर उभी होती. तिला चटकन आत घेण्यात आलं होतं आणि दरवाजा लावून घेण्यात आला होता. वर्दळीचा आवाज नसल्यानं गाडीचं दार बंद झालेला आवाज मिस्टर वाघच्या कानावर स्पष्टपणे पडला. गाडी निघून गेली.

दुसरीकडे इन्स्पेक्टर हजारेनं आपल्या टीमला हॉटेल्स, रेस्टॉरंट, ढाबा, कत्तलखाना जिथं जिथं वैध-अवैधरित्या गोमांस मिळतं तिथं तिथं छापे मारायला सांगितलं. आणि त्यांच्या शेफ्स व कुक्सना अटक करण्याचे आदेश दिले. गोमांस बंदीच्या नावाखाली तो हे करू शकत होता. त्यामुळे खऱ्या खून्याला शंका येण्याचं काहीच कारण नव्हतं...

त्याच्या आदेशानुसार शेफ्स व खाटीकांना पोलीस स्टेशनला गोळा करण्यात येवू लागलं होतं...

तिकडे मिस्टर वाघचं काही तरी वेगळंच चालू होतं. रेंज रोव्हरचा नंबर त्याला मिळाला होता. गाडी पाहिल्यावरच त्यानं तो टिपून घेतला होता. आपल्या हॅकिंग स्किल्स वापरून त्यानं आरटीओ डेटाबेस मधून त्या गाडीची माहिती मिळवली. ती पुष्पक मेस्त्री नांवाच्या कुठल्यातरी माणसाची होती.

मिस्टर वाघनं पुष्पक मेस्त्रीला फोन लावून त्याला भेटण्याची वेळ घेतली,

"हॅलो, मी नज़ीम अहमद बोलतोय!" मिस्टर वाघ पुष्पक मेस्त्रीला म्हणाला.

"हा बोला...!" पलीकडून पुष्पकने उत्तर दिलं, पण त्याच्या आवाजावरून तो अनोळखी व्यक्तीशी बोलतोय हे स्पष्ट होत होतं. 'आपण कोण? मी आपल्याला ओळखलं नाही...' हा अर्थ त्या बोलण्यात निहित होता.

"साहेब, मी एक छोटा शेतकरी हाय. हळदीची लागवड करतू. आपण हळदीचा व्यापार करता असं समजलं. म्हणून फोन केला..." मिस्टर वाघ त्याला म्हणाला.

"हा होय! पण माझी ठरलेली लोकं आहेत. त्यांच्याकडूनच मी हळद खरेदी करतो." तिकडून मेस्त्री बोलला.

"साहेब, असं करू नका. एकदा भेटा. मला खात्री हाय तुमाला आमच्या हळदीची क्वालिटी नक्की आवडंल."

"मित्च! बरं संध्याकाळी यायला जमेल?" त्यानं ही ब्याद एकदाची टाळू असा विचार करून विचारलं.

"हा व्हय साहेब!"

"बरं सात वाजता या. मी पत्ता मेसेज करतो."

"नक्की नक्की साहेब! थॅन्क्यु साहेब! ठेवतो साहेब!" म्हणत मिस्टर वाघनं फोन ठेवला आणि नेहमीच कुटील हसला...

# ४.

एकएका कसायाची आणि सेफची कसून चौकशी होत होती, पण म्हणावं असं महत्त्वाचं काही हाती लागत नव्हतं. त्यांच्याकडील चाकूच काय, पण असणाऱ्या सगळया हत्यारांची फॉरेन्सिक कडून तपासणी केली जात होती. डॉग स्कॉडला पण मोठ्या संख्येनं कामाला लावलं होतं. सांगावकरच्या डेडबॉडीची स्मेल कुत्र्यांना देऊन पकडलेल्या लोकांमधून खुनी शोधण्याचा शेवटचा पर्याय हजारे अँड टीमने करून पाहिला, पण असफल ठरले. तरीही हजारे हार मानणाऱ्यातला नव्हता. 'आर्टिकल ४८' च्या अंतर्गत या सगळया लोकांना हजारेनं जेलमध्ये डांबून ठेवण्यात आलं.

पण या सगळयांत मिलींद हजारेच्या एक गोष्ट लक्षात आली नव्हती, की खूनी शेफ किंवा कसाईच असावा असा काही नियम नव्हता. एखादी सामान्य व्यक्ती जीला 'चक कट' बद्दल माहिती असेल. तर इन्व्हेटिगेशन भरकवटण्यासाठी त्या व्यक्तीनं असं करण्याची पण शक्यता होती, जी त्यानं लक्षातच घेतली नव्हती.

कारण एखादा सेफ जर खूनी असता, तर त्यानं सगळेच खून त्याच्याकडील चाकूने आणि एकाच पद्धतीने करण्याची शक्यता होती. पण सगळे खून वेगवेगळया पद्धतीने करण्यात आले होते...

"या अन्यायाविरुद्ध हजारेंना तुम्ही काहीच बोलला नाहीत?" मी आश्चर्याने मिस्टर वाघला विचारलं.

"कसला अन्याय? बीफ ऍक्ट मला पटतोय अशातला भाग नाही. पण प्रत्येक जीवाला जगण्याचा तितकाच अधिकार आहे जितका माणसाला. एवढं मी नक्कीच मानतो!" मिस्टर वाघनं मला गप्प केलं.

माझ्यासाठी हा उपहास होता. हे तो व्यक्ती बोलत होता, ज्याला माणसं मारायला खूप मजा येते. आणि पशु संरक्षण बद्दल बोलायचंच, तर त्यासंदर्भात रीतसर कायदा असून देखील भारत बीफ एक्स्पोर्टमध्ये ब्राझील आणि ऑस्ट्रेलिया नंतर टॉपला आहे. आणि हा मिलियन्स ऑफ डॉलर्सचा धंदा आहे. अजूनही...!

असो, मिस्टर वाघ पुढं काय सांगतोय हे ऐकण्यासाठी मी तयार झालो...

मिस्टर वाघ संध्याकाळी ठीक सात वाजता पुष्पक मेस्त्रीच्या घरात होता. वेश एका साधारण व्यक्तीचा. त्यानं मेकअप असा केला होता, की तो पन्नास वर्षावरील एक मुस्लिम म्हातारा वाटावा. सोबत त्यानं काही उच्च दर्जाची हळद त्याला दाखवायला आणली होती.

मेस्त्री मिस्टर वाघला लवकर घालवण्याच्या बेतात होता. म्हणून त्यानं त्याला घरात न घेता लॉनमध्येच बसवलं. त्याच्यासाठी चहा करून आणण्यासाठी पण कोणाला सांगितलं नाही.

(ही गोष्ट खरं तर मिस्टर वाघच्या पथ्यावरच पडली...)

"ती हळद तुम्ही कुठून उत्पन्न केली?" मी अचंब्यानं विचारलं.

"झालास सुरू?" त्यानं वैतागाने विचारलं,

"तू गप्प सगळं आधी ऐकून का घेत नाहीस?"

"सॉरी! पण ज्या - त्यावेळी शंका दूर झालेली बरी!" मी म्हणालो.

"माझी शेती आहे. तिथं हळद देखील पिकवली जाते. औषधांसाठी व कॉस्मेटिक्स बनवणाऱ्या कंपन्यांना आम्ही ती एक्स्पोर्ट करतो."

"मला माहित नव्हतं तुम्ही शेती देखील करता..." मी विचारलं.

"शेती करतो, पण मी नाही. माझी फक्त जमीन असते. राबतो शेतकरीच. सगळं उत्पन्न त्यांचंच. मी त्यातला रुपायाही घेत नाही. हळदीचं शेत पण आताच विकत घेतलंय. थँक्स टू मेस्त्री! त्याला भेटण्यासाठी मला ते खरेदी करावं लागलं."

"कसं आणि ते?" मी वैतागत विचारलं.

"आपल्या आजूबाजूला हळद पिकवणाऱ्या सगळ्या शेतकऱ्यांना भेटलो. त्यांना पर्मनंट बायर मिळवून देण्याच्या आश्वासनावर त्यांच्या शेतजमिनी विकत घेतल्या व त्यांतील बेस्ट क्वॉलिटी हळद घेऊन मी मेस्त्रीकडे पोहोचलो."

"आणि मेस्त्रीची तेवढी हळद घेण्याची तयारी नसेल, तर?" मी शंकीत होऊन विचारलं.

"आय हॅव लॉट्स ऑफ कॉन्टॅक्ट्स सूरज! आणि माझा काय मेस्त्रीला हळद विकण्याचा मेन मोटिव्ह नव्हताच हे विसरू नको. शिवाय त्याला तशी ती विकत घ्यायची इच्छा पण नव्हती. फक्त मेस्त्रीमुळं मला दुसरा एक बिझनेस मिळाला इतकंच. माझी नवी कंपनी व टीम हळदीचा सगळा व्यापार बघते आहे. हळद एक्स्पोर्ट करण्यासोबतच आता आम्ही स्वतः ती प्रोसेस करणार आहोत!"

चला याचा एखादा व्यवसाय तरी कळाला... नवा का असेना! मी मनातल्या मनात म्हणालो.

"तू विषय भरकवटू नको. ऐक!" म्हणत त्यानं प्रोसिड केलं.

"हळदीचा पोत तर चांगला आहे. पण आत्ता डील नाही होऊ शकणार. माझी ऑलरेडी इन्व्हेस्टमेंट झाली आहे. आता ती रिकव्हरी झाल्याशिवाय मी तुमची हळद नाही घेऊ शकत." सिगरेटचा झुरका सोडत मेस्त्री मिस्टर वाघला म्हणाला.

"मग पर्याय काय..." खोटी नाराजी दाखवत नज़ीम अहमद रुपी मिस्टर वाघनं विचारलं.

"लोणची बनवणारी एक कंपनी माझ्या ओळखीची आहे. मी तुम्हाला त्यांच्याशी ओळख करून देऊ शकतो, पण चाळीस परसेंट माझे असतील." थोडा विचार करून दुसरी सिगरेट पटवत मेस्त्री म्हणाला.

"चाळीस जास्त होत्यात. माझा काय तरी फायदा व्हायला पायजेना साहेब!" मिस्टर वाघ म्हणाला.

"तुमचा माल विकला जातोय. आणि प्रोडक्शन कॉस्ट निघते आहे हा फायदा नाही का? आणि एकदा ओळख झाल्यावर पुढच्या डिलिंगला पुन्हा तुम्ही मला थोडीच विचाराल? तो फायदा तुमचाच नाही का?" धूर सोडत मेस्त्री स्मित करत बोलला.

"तसं नाय साहेब! तुम्हाला हवी त्यावेळी सांगा तुमच्याशी पण व्यवहार करू!" थोडा विचार करून,

"ठीक हाय चालंल!" मिस्टर वाघनं सहमती दर्शवली.

"मी कळवतो तुम्हाला!" मेस्त्रीनं प्रतिक्रिया दिली.

"आताच बघितलंत तर जरा बरं हुईल..." मिस्टर वाघनं विनंती केली.

'काय वैताग आहे?' असा भाव चेहऱ्यावर आणत मेस्त्रीनं त्याच्या ओळखीच्या कंपनीला फोन लावला. आणि नज़ीम रुपी मिस्टर वाघ व त्या कंपनी ओनरची बातचीत घडवून आणली.

"खूप धन्यवाद बघा साहेब." कॉल कट करून मोबाईल मेस्त्रीला परत करत मिस्टर वाघ बोलला.

"ते ठिक आहे, पण माझ्या कमिशनचं विसरू नका म्हणजे झालं!" मेस्त्री तिसरी सिगरेट सुलगावत म्हणाला...

"व्हय व्हय." मिस्टर वाघ कृतज्ञतेचं हसू चेहऱ्यावर आणत म्हणाला.

"साहेब, आता आपण मित्र झालोत... झालोत ना?"

"हं!" मिस्टर वाघच्या प्रश्नावर मेस्त्री तोंडातील सिगरेट न काढताच हुंकारला. त्या सोबत धूराचा भपकारा बाहेर पडला.

"मग मित्राच्या नात्यानं एक विचारू?"

"हं!" मेस्त्रीनं हुंकारूनचं परवानगी दिली.

"तुम्ही कोणत्या टेंशनमध्ये हाय काय?"

"न... नाही तसं काही नाही!" आतापर्यंत कॉन्फिडन्टली बोलणारा मेस्त्री चपापला.

"नाय आल्यापासून बघतोय तुमी लय सिगारेटी फुकताय. म्हणून आपलं वाटलं..."

"माझी सवय आहे ती?"

"सवय; की गाडी चोरीला गेल्याची चिंता?" मिस्टर वाघनं रोखून पाहत मेस्त्रीवर बॉम्ब फोडला.

"कोण आहेस तू?" मेस्त्रीनं चाचरत पण आवाज चढवून विचारलं.

मेस्त्रीने हा प्रश्न करणं स्वाभाविक होतं.

"घाबरू नका. मी विजय वाघ. पोलिसांसाठी काम करतो. तुमची गाडी, ब्लॅक रेंज रोव्हर काल पोलिसांना सापडली. चोर अमॅच्युअर असावेत बहुदा! कार तर चोरली, पण नंबर प्लेट बदलायला विसरले. पण त्यामुळं तुम्हाला शोधणं सोपं गेलं."

"ती माझी गाडी नाही! माझी गाडी सध्या माझा एक मित्र वापरतोय."

"मला माहिती आहे, ती गाडी तुमच्या एका मित्राने तुम्हाला गिफ्ट दिली आहे. होय ना? पण नाही! ती संदेश चौरसिया या मित्राच्या शोरूम मधून ऑफ द रेकॉर्ड तुम्हीच खरेदी केलीत. आणि त्याला तुम्हाला ही गाडी गिफ्ट स्वरूपात द्यायला तुम्हीच सांगितलंत. टॅक्स वाचवण्यासाठी. त्याचाही फायदा आणि तुमचाही! नाही?! गाडी चोरीला गेली, पण कंप्लेन्ट कशी करणार? केली; आणि आपला दोन नंबर कारभार उघडकीला आला तर? मग काय? म्हणून झंझटच नको, म्हणून तुम्ही गाडी चोरीला गेल्याची तक्रार पोलिसांत केली नाही. एक प्रायव्हेट इन्वेस्टीगेशन फर्म तुमच्या गाडीचा शोध घेतीये सध्या. जीला तुम्हीच कामाला लावलं आहेत."

"त्यानं एका इन्व्हेटिगेशन फार्मला हायर केलंय हे तुम्हाला कसं समजलं?" मी त्याला थांबवत विचारलं.

त्यावर तो हसला. म्हणाला,

"कारण ती माझीच एक फर्म होती!"

बकरा स्वतःहून वाघाच्या तोंडात गेल्याची ही आगळी घटना...

"तुम्ही काय बोलताय मला कळत नाही!" मेस्त्री चिडून मिस्टर वाघला बोलला.

"सोडा! मुद्याचं बोलूया. ही नोटीस!" म्हणत त्यानं पोलिसांची एक प्रत त्याच्यासमोर ठेवली. म्हणाला,

"गाडी घेऊन जा. तुम्हाला काही कोणी पकडणार नाही. पण जरा आमचे खिसे गरम करावे लागतील एवढंच!"

"किती?" नजर रोखत मेस्त्रीने विचारलं.

"आता कसं तुम्ही पण मुद्यावर आलात!" मिस्टर वाघ कुटील स्मित करत म्हणाला.

"आकडा!" मेस्त्री आणखीनच मुद्याचं बोलला.

"दहा लाख!"

"हे जास्त होतायत!" तो ठामपणे म्हणाला.

"तुम्हाला गणित समजावतो! तुमची गाडी आहे एक कोटी ब्याऐंशी लाखाची. दहा लाख जर दिले नाहीत, तर एक कोटी ब्याऐंशी जातील. वर इन्कम टॅक्स रेड पडेल ती वेगळीच. त्च्च! स्स्स्स्... सगळंच जाईल! म्हणून दहा लाख ही काही मोठी रक्कम नाही. उलट कमीच आहे. थेंब देऊन समुद्र वाचवाल तुम्ही. आहात कुठे?"

"बरं!" जळफळत नाखुषीने मेस्त्री तयार झाला.

"तेवढी कॅश असेलच घरी!" मिस्टर वाघ हसत म्हणाला.

तसा मिलिंद मेस्त्री उठला आणि आतून पैशाचं एक इन्वेलोप घेऊन आला व त्यानं ते पैसे मिस्टर वाघच्या सुपूर्द केले.

"या कॉपीवर तेवढी सही करा. म्हणजे इन्स्पेक्टरना कळेल आपलं डील झालेलं. आणि तुम्हाला तुमची गाडी मिळून जाईल. हे सगळे मला नाहीत ओ. आम्हा गरिबांना यातून पाच दहा

हजारच सुटतात फक्त. बाकी डिपार्टमेंट मधेच वाटून घेतात." मिस्टर वाघ खोट्या नाराजीने म्हणाला.

मेस्त्रीने लगेच सही केली. आणि त्यानं चौथी सिगरेट ओठांत धरली. मिस्टर वाघमुळं मागची सिगरेट जरा लवकरच संपली होती.

"नाईस!" सोफ्यावरून उठत मिस्टर वाघनं त्याच्याकडील लायटरनं मेस्त्रीची सिगरेट सुलगावली. मेस्त्रीचा श्वास-उच्छवास रागाने इतका दीर्घ झाला होता, की त्यामुळे नुकतीच पेटवलेली सिगरेट अर्धी संपली देखील होती.

जळलेल्या सिगरेटची राख खाली पडली तसा मिलिंद मेस्त्रीही!

मिस्टर वाघनं त्याच्यासमोर सहीसाठी ठेवलेली खोटी प्रत उचलली आणि तो पैसे घेऊन शांतपणे निघून गेला...

# ५.

"आय मिन वाय? लिटरली वाय?" मी किंचाळलोच!

"बिकॉज आय हेट ग्रीडी पीपल!" तो शांतपणे म्हणाला.

"आणि तुला कसं ते सुद्धा जाणून घ्यायचं असेल!" त्यानंच विचारलं.

मी काहीच बोललो नाही.

"ऐक!" माझी संमती आहे का नाही हे जाणून घेण्याची तसदी न घेता तो सांगू लागला,

"लायटरमध्ये हायड्रोजन सायनाईड होतं. लायटर सुलगावल्यावर फ्लेमची हायड्रोजन सायनाईडशी रिएक्शन झाली. आणि त्या विषारी फ्युमनं मेस्त्री मेला. हायड्रोजन सायनाईड इज हायली फ्लेमेबल अँड व्हेरी टॉक्सिक! इट कॅन किल पीपल इन्स्टंटली! आणि तेच मिलिंद मेस्त्री सोबत झालं! ही शुड हॅव बिन अवेअर, दॅट स्मोकिंग इज इंजुरीअस तो हेल्थ!" पुन्हा कपटी आणि नीच हसू त्याच्या ओठांवर तरळलं.

"पण का?" मी अगदी काकुळतीला येऊन विचारलं,

"त्या बिचाऱ्याचा या सगळ्यांशी काही संबंध नव्हता! हां! तोही गुन्हेगार होता. इन अदर सेन्स... पण तरी..." मी माझा मुद्दा सोडायला तयार नव्हतो. कारण त्यानं सांगितलेलं कारण मला समाधान देणारं नव्हतं.

"कारण मी इकडे शेतकरी आणि शेतीला संरक्षण देण्याचा प्रयत्न करतोय, वाढवायचा प्रयत्न करतोय आणि हा साला त्याच शेतकऱ्यांची पिळवणूक करतोय!" तो चिडून म्हणाला आणि थोडावेळ तो शांत झाला आणि मग म्हणाला,

"तो टॅक्स चोरत होता! आणि ही देशाशी केलेली गद्दारी आहे. अशा लोकांना मोकळं सोडणं म्हणजे सामान्य लोकांवर केलेला अन्याय ठरेल! म्हणून... म्हणून!" बोलताना मिस्टर वाघ खूपच कन्सर्न्ड् वाटत होता.

"आणि तुम्ही पकडला गेला असता तर..." मी माझा नेहमीचा प्रश्न केला.

"इतके दिवस माझ्यासोबत असून तुला असा प्रश्न पुन्हा पुन्हा पडतोच कसा?" त्यानं मला विचारलं.

मला माहित आहे तो कशातच कधी अडकणार नाही, पण त्यानं हे केलं कसं हे जाणून घेणं माझ्यासाठी महत्त्वाचं असतं. कारण तेच माझं काम आहे!

"त्याला लंग्ज कॅन्सर होता. सलग सिगरेट्स पिऊन त्यामुळं तो त्याच कारणानं मेलाय असा घरच्यांचा समज झाला."

"आणि संशय येऊन त्यांच्या फॅमिलीनं पोलीस कम्प्लेन्ट केली असती; तर?" मी विचारलं.

मी त्याचा पाठलाग सोडायला तयार नव्हतो. मला त्याच्या बुद्धिमत्तेची परीक्षा घायची होती.

"तर काय? त्याची अटॉप्सी झाली असती!"

"तुम्ही किती सहज बोलताय? रिपोर्टमध्ये समजलं असतं ना, की मिलिंद मेस्त्री कशामुळे मेलेत ते... शिवाय त्यांच्या घरी सीसीटीव्ही असतीलच. तुम्ही नक्कीच पकडला गेला असता..." मी काळजी व्यक्त केली.

"एन्टरन्सलाच चार कॅमेरे होते."

"तरी तुम्ही रिस्क घेतलीत?" मला काही सुधारेना.

"आपलं ध्येय गाठण्यासाठी जोखीम घ्यावीच लागते सूरज! आणि पोलिसांनी शोध घेतलाच असता, तर तो नज़ीम अहमदचा! जो अस्तित्वातच नाही!" तो हसत म्हणाला आणि त्यानं डोळा मारला.

हं!... मला काय बोलावं सुचेना. मिस्टर वाघचा एस्केप प्लॅन इतका परफेक्ट असतो, की मी कितीही प्रयत्न करून त्यात काही चूक किंवा खोट काढूच शकत नाही!...

असो... मिलिंद मेस्त्रीला मारून मिस्टर वाघने या प्रकरणातील त्याचा पहिला बळी घेऊन त्याच्या सायकॉलॉजिकल खूनी खेळाचा श्रीगणेशा केला होता...

आता बघायचं हे आहे, की त्याच्या या कर्मयज्ञात अजून कोण - कोण त्याच्या हातून समिधा म्हणून स्वाहा होतंय...!

"लायटरनं मेस्त्रीला मारायचं हे तुम्ही कसं ठरवलंत?" मी विचारलं.

"केस संबधित कोणत्याही माणसाची मी सगळी माहिती आधी काढतो हे तुला माहितच आहे. त्याला सिगरेटचं व्यसन आहे आणि त्याला त्यामुळं लंग्ज कॅन्सर पण झालाय हे मला माहीत झालं होतं. म्हणून मग तो लायटर तयार केला.

"पण जाता जाता मेस्त्री एक काम चांगलं करून गेला. एक नवीन बिझनेस आयडिया देऊन गेला. ज्यात शेतकऱ्यांचा पण फायदा झाला आणि माझाही!"

पुढं सांगण्याआधी मिस्टर वाघ बोलला. आणि त्यानं प्रोसिड केलं...

मिस्टर वाघचा इकडं हा धंदा चाललेला, तर दुसरीकडं धन्वंतरी फार्माचा एमडी मिथिल अदीप भारद्वाज त्याच्या उरलेल्या बोर्ड ऑफ डिरेक्टर्सशी कॉन्फरन्स रूममध्ये चर्चा करत होता...

"मला माहित आहे, आपले काही साथीदार गेल्यानं आपला खूप मोठा लॉस झालाय. आणि मी हे पैशांच्या बाबतीत म्हणत नाही! खरंच! आपले सर्व दिवंगत बोर्ड मेंबर्स् अत्यंत हुशार आणि नेहमीच कंपनीचं हित पाहणारेच होते. आणि म्हणूनच ते रिस्पेक्टेबलही होते आणि तसेच तुम्हीही आहात. पण ते गेले म्हणून आपण आपलं काम तर नाही ना थांबवू शकत? म्हणून मी रिक्वेस्ट करतोय, की कंपनीच्या भल्याचा विचार करा आणि या प्रोजेक्टला सहमती द्या!" मिथिल एका प्रपोसलकडं निर्देश करत म्हणाला.

"सॉरी! वी कान्ट अलाव थिस! थिस इज अट्टर्ली रिडीक्युलस!" एक वयस्कर बोर्ड मेंबर साकेत मिश्र चिडलेल्या स्वरात म्हणाला.

संवाद थांबला होता. मिथिलनंही त्याची जागा आणि कॉन्फरन्स रूम सोडली होती...

मिस्टर वाघशी बोलणाऱ्या निशांत या बोर्ड मेंबरने मिस्टर वाघला ही माहिती पुरवली होती.

"सगळेच शॉकमध्ये आहेत, तरी एमडींना या प्रपोसलचं पडलंय... हे अगदीच न पटण्यासारखं आहे..."

"कसलं प्रपोसल?" मिस्टर वाघनं विचारलं.

पण त्याच्या या प्रश्नाचं उत्तर देणं मात्र निशांतनं टाळलं होतं. आणि मिथिलची केबिन दाखवून तो बाहेरूनच निघून गेला होता.

जेवढं सांगणं त्याला महत्त्वाचं वाटलं ते त्यानं सांगितलं होतं. या उपर त्या प्रपोसल संदर्भात मिस्टर वाघनं काय तो शोध घ्यावा हा निशांतच्या गप्प बसण्या मागचा अर्थ होता.

"नमस्कार, आत येऊ?" मिस्टर वाघनं मिथिलची परवानगी घेतली.

"कोण?" मिथिलनं त्याला आत येण्याची परवानगी न देता दारावर उभा करूनच विचारलं.

"मी विजय वाघ. प्रायव्हेट इन्वेस्टीगेटर. तुमचे दिवंगत बोर्ड मेंबर नारायण सांगावकर यांच्या फॅमिलीने त्यांच्या मृत्यूचा तपास करण्यासाठी मला हायर केलं आहे. ही केस हाताळत असलेल्या इन्स्पेक्टर मिलींद हजारे यांनी तुम्हाला माझी माहिती दिली असेल..." मिस्टर वाघ संकोचल्यासारखा बोलला.

"हो. हो. या!" मिथिलनं मिस्टर वाघला त्याच्या केबिनमध्ये प्रवेशन्याची सहमती दिली.

मिस्टर वाघ मिथिलच्या डेस्कपाशी पोहोचला. मिथिलनं त्याला बसण्यासाठी खुर्ची ऑफर केली.

"बसा!" मिथिल मिस्टर वाघला म्हणाला.

मिस्टर वाघ त्याच्यासमोर बसला.

"तुम्ही काही बोलण्या - विचारण्याआधीच मी तुम्हाला स्पष्ट सांगतो, की जी काही माहिती द्यायची होती, ती इन्स्पेक्टरना आम्ही दिली आहे. या नंतर सांगण्यासारखं आमच्याकडे काही नाही. आमची स्टेटमेंट्स जमा आहेत. तुम्ही ती वाचून घेतलीत, तर बरं होईल. तुमचा व आमचाही वेळ वाचेल!" मिथिलनं मिस्टर वाघला हाकलून लावण्याचा प्रयत्न केला.

"स्टेटमेंट्स मी वाचली आहेत. मला तुम्हाला काहीच प्रश्न विचारायचे नाहीत. मी फक्त तुमचं ऑफिस पहायला आलोय. पण तुमची परवानगी असेल, तरच!"

"बरं! पण कशाला हात लावू नका!" खूप विचारांती दीर्घ श्वास सोडून मिथिल म्हणाला.

"थँक्स!" मिस्टर वाघनं हसून आभार मानले.

"या. तुम्हाला आमच्या मॅनेजरशी भेट घालून देतो. ते तुम्हाला आमची सगळी डिपार्टमेंट्स दाखवतील. या!" मिथिल खुर्चीतून उठत म्हणाला.

मिस्टर वाघनं त्याला फॉलो केलं.

दोघं ऑफिसच्या कॉरिडॉरमध्ये चालत असताना मिथिल त्याला म्हणाला,

"सॉरी थोडा रूड वागलो, पण काय आहे, या प्रकरणामुळं खरंच खूप त्रास झालाय ओ... बिझनेसवर आणि सर्व एम्प्लॉईजवर पण याचा इफेक्ट झालाय. हे सगळं आमच्याच बाबतीत का होतंय ते कळतं तर नाहीच, पण आमच्यातील आणखी कोणी आणि कधी मारला जाईल, याची पण काही खात्री नाही...!"

"भिण्याचं कारण नाही. तुमच्या कंपनी मधील लोकच मारले गेलेत असं नाही. त्यामुळं तुम्ही घाबरण्याचं काहीच कारण नाही!" मिस्टर वाघ त्याला आश्वस्त करत म्हणाला.

"गेस यु आर राईट!" मिथिल अजूनही नाराजीतच म्हणाला.

दोघं मॅनेजरच्या केबिन पाशी पोहोचले होते. मिथिलनं नॉक न करताच दरवाजा उघडला आणि मॅनेजरला हाक मारली.

"लोहकरे!"

मॅनेजर लगबगीनं बाहेर आला.

"हे पोलिसांकडून आलेत. यांना आपली कंपनी नीट दाखवा." मिथिलनं मॅनेजरला आज्ञा केली.

"होय सर!" मॅनेजर मिथिलला बोलून त्यानं मिस्टर वाघला मागून येण्याची विनंती केली,

"इकडून सर!" तो मिस्टर वाघला म्हणाला.

मिस्टर वाघनं स्मित करून होकारार्थी मान डोलावली व मिथिलला पुन्हा धन्यवाद देऊन तो मॅनेजर मागून चालता झाला...

सगळी कंपनी पाहून झाल्यावर मिस्टर वाघनं पुन्हा मिथिलची गाठ घेतली आणि तो निघून गेला...

# ६.

मिथिल आपल्या प्रपोसलचा हेका काही केल्या सोडायला तयार नव्हता. मिस्टर वाघ येऊन गेल्यानं तो बिथरला नक्कीच नव्हता, पण सावध मात्र झाला होता. मिस्टर वाघ गेल्या-गेल्या सगळया ऑफिसमध्ये शोधाशोध करून त्यानं लगेच तातडीची बोर्ड मीटिंग बोलावली,

"गेल्या काही दिवसांत झालेल्या नुकसातून हीच एक डील आपल्याला बाहेर काढू शकते." तो मीटिंगमध्ये म्हणाला.

हेच मिथिल पुन्हा पुन्हा सर्वांना पटवून देण्याचा प्रयत्न करत होता आणि त्यासाठी पुन्हा मिस्टर वाघ येऊन गेल्याच्या दिवशी तातडीची मिथिलनं बोर्ड मीटिंग त्यानं बोलावली होती...

"जे झालं, ते वाईट झालं... आपले तिसरे बोर्ड मेंबर सांगावकर अकाली मृत्यूमुखी पडले..." अत्यंत कळवल्यानं तो बोलला.

"खून आहे तो..." बावन्न वर्षांचा निशांत पुरोहित हा बोर्ड मेंबर मिथिलला पुढं न बोलू देता ठामपणे रागाच्या स्वरात म्हणाला.

"खरंय तुमचं... पण तुमच्या लक्षात येतंय का... की तेच लोक मारले जात आहेत, ज्यांनी माझ्या एमडी होण्याला विरोध दर्शविला होता...!" खोटी आसवं ढाळत मिथिल बोलला.

"म्हणजे तू?" पुढं निशांतला काही बोलवलं नाही. तो सडन शॉकमध्ये गेला.

"हो!" चेहऱ्यावरचे भाव बदलत आणि ते अत्यंत क्रूर स्मित करत मिथिल म्हणाला,

"मला एमडी करण्याच्या माझ्या बापाच्या निर्णयापुढं तुमचं काही चाललं नाही, म्हणून तुम्ही मी आणलेल्या प्रत्येक प्रस्तावाला नाकारण्याचा सपाटाच लावलाय! आणि हे मला समजत नाही असं समजू नका! आय कान्ट टॉलरेट थिस! मी हे खपवून घेणार नाही!"

"म्हणजे तुम्ही आम्हालाही मारणार तर?" दिनेश मेहता या बोर्ड मेंबरने निर्भयपणे विचारलं.

"तुम्हाला मी कोण वाटतो ओ? सायकोपॅथ?" मिथिलनं वैतागून विचारलं. म्हणाला,

"एक तर मला साथ द्या, नाही तर राजीनामे! हा, पण दोन्ही जमणार नसेल, तर मात्र माझ्याकडं पर्याय उरणार नाही!" पुढच्याच क्षणी शांतपणे मिथिलनं आपलं म्हणणं मांडलं,

"आणि पोलिसांत वैगैरे जाण्याचा प्रयत्न केलात, तर मी तेही मॅनेज करू शकतो हे तुम्हाला माहीत आहेच. पैसा बोले जग डोले उगाच म्हणत नाहीत आपल्यात! चार पैसे फेकले, की मी पुन्हा तुमची वाट लावायला बाहेर!" म्हणत त्यानं प्रश्न करणाऱ्याकडं तिरकं पाहत मंद पण अत्यंत कपटी स्मित केलं.

"काय भाषा आहे? आपल्या वडलांच्या नांवाला आणि कंपनीला बट्टा लावणारी अवलाद आहेस तू!" साठ वर्षांचा दिनेश दात-ओठ खात म्हणाला.

त्याचं असं बोलणं मिथिलला ऐकवलं नाही. सेमी ऑटोमॅटिक पिस्टल घेऊन तो टेबल वर चढूनच दिनेशच्या समोर टेबलवर जाऊन बसला.

त्यानं दिनेशच्या खुर्चीच्या आर्मरेस्टवर असलेला दिनेशचा डावा हात उजव्या पायाने दाबला आणि पिस्टल लोड करून त्याच्या दोन भुवयांच्यामध्ये रोखलं. हे पाहून एसीत असून देखील निशांतला घाम फुटला. त्याच्या हनुवटीवरून घामाचे थेंब त्याच्या शर्ट व ट्राउझरवर ओघळू लागले.

"म्हाताऱ्या! तूच सगळयात आधी माझ्या एमडी होण्याला नकार घंटा वाजवली होतीस हे मी विसरलो नाही! पुढं जर चपर चपर केलीस ना, तर हा ट्रिगर दाबला गेलाच म्हणून समज!" मिथिल रागानं बोलला.

आणि लगेच त्यानं भाव बदलत इतर बोर्ड मेंबर्सवर विनंती रुपी नजर फिरवत तो बोलला,

"काय मागणी आहे माझी? माझं म्हणणं इतकंच आहे, की आपण आपल्या कंपनी अंतर्गत 'व्हिएक्स'ची निर्मिती करावी! किती मोठी ऑर्डर आहे माहीत आहे का तुम्हाला? इतकी मोठी संधी आपण हातची जाऊ देतोय..."

त्याच्या वागण्यात विकृती स्पष्ट दिसत होती.

"जाऊ देतोय तेच बरंय! आपण औषधं बनवतो ते लोकांचे प्राण वाचावेत म्हणून. आपण काही कोणी टेररिस्ट किंवा नाझीज नाही आहोत, की टॉक्सिक 'नर्व एजन्ट' तयार करून लोकांना मारावं!" पिस्टल माथ्याला असून दिनेशनं निडरपणे बोलण्याचं धाडस केलं होतं.

पण त्या धाडसाचं फळ त्याला लगेचच मिळालं!

"म्हातारा आहे, पप्पांचा मित्र आहे, कंपनी चालू झाल्यापासून पप्पांच्या सोबत आहे म्हणून तुला सहन करत आलो, ऐकत आलो! म्हणूनच तू आत्तापर्यंत वाचलायंस! नाही तर पहिला नंबर तुझाचं होता... पण आता बास! खूप झालं! तुझी वेळ आली! मोठ्या मोठ्या देवांची नांवं घे!"

मिथिलचं बोट ट्रिगरवर कसू लागलं. दिनेश निडरपणे मिथिलच्या डोळ्यांत पाहत होता. बाकी बोर्ड मेंबर्स स्तब्ध होते. आपला जीव प्रत्येकाला प्यारा होता म्हणून मिथिलला अडवायला उठण्याचं धाडस कुणीच केलं नाही. दिनेशची जहाल नजर मिथिलला सोसवली नाही. तो अत्यंत चिडला आणि...

"चल मीच नांव घेतो. जय... श्री... राम...!" म्हणत त्यानं ट्रिगर खेचला.

पिस्टलच्या गोळीचा आवाज कॉन्फरन्स रूम भर घुमला. सगळेच शॉकमध्ये. मात्र कॉन्फरन्स रूम साऊंड प्रूफ असल्यानं आत काय झालंय हे बाहेरील एम्प्लॉईजना मात्र काहीच अंदाज आला नव्हता. ते आपले नॉर्मली आपलं काम करत राहिले होते.

कॉन्फरन्स रूममध्ये सर्वच सुन्न! मिथिल टेबलवरच बसून होता, पायाने दिनेशचा हात चिरडत. त्यानं तिरकस बाजूलाच बावरून आणि घाबरून बसलेल्या निशांतकडं पाहिलं. तसं निशांतला कापरं भरलं.

"आणि तू! जरा संभाळूनच रहा! बाहेर तुझे काय उपद्व्याप चाललेत ते मला माहीत नाही असं समजू नको!" मिथिलनं पिस्टलचं बॅरेल निशांतवर रोखून नाचवत तो निशांतला म्हणाला,

"नाही तर इथं मोठं होल पडंल!" म्हणत मिथिलनं बॅरलचं नोक निशांतच्या कनपट्टीवर दाबलं.

घामाने निथळलेला निशांत घाबरून थरथरत खाली बघत होता... हे पाहून मिथिलच्या चेहऱ्यावर क्रूर स्मित उमटलं,

"गुड! मला वाटतं आता कुणालाच काहीच ऑब्जेशन असणार नाही!" टेबल वरून खाली उतरत पिस्टल वरील गनपावडर आपल्या रूमालाने साफ करत मिथिल सर्वांना म्हणाला.

आणि सर्वांची सहमती त्याने स्वतःच ठरवली. पण त्याची ही कृती न पटलेल्या दोघा-तिघांनी आपापले राजीनामे तक्षणी लिहून देण्याची चुकभुल केलीच... त्यात निशांतही होता.

"सर, सिदात...!" एक जण परवानगी न घेता कॉन्फरन्स रूममध्ये गडबडीनं घुसत म्हणाला.

त्याच्या बोलण्याने मिथिल गंभीर झाला. त्या व्यक्तीनं वाक्य जरी पूर्ण केलं नसलं, तरी त्याला काय म्हणायचंय हे मिथिलला समजलं होतं. आणि म्हणून लगेचच तो कॉन्फरन्स रूम बाहेर पळाला...

मिथिल आणि त्याला इन्फॉर्मेशन देणारा व्यक्ती एक्सपरिमेन्ट रूममध्ये घाईने पळत घुसले. मिथिलनं एकच कटाक्ष सोबतच्या व्यक्तीवर टाकला, तशी ती व्यक्ती बाहेरून दरवाजा लावून घेऊन निघून गेली.

आणि खूप विदारक अशी एका माणसाची किंकाळी त्या ठिकाणी घुमली...

याच्या पुढं तिथं काय झालं एवढं मात्र मिस्टर वाघला समजलं नाही...

"पण मुळात एवढं तरी तुम्हाला कसं कळलं ते मला समजत नाही..." मी मिस्टर वाघला म्हणालो.

"मी काय बागेत फिरायला म्हणून धन्वंतरी फार्माच्या ऑफिसरवर गेलो नव्हतो!" मिस्टर वाघ उपहासानं म्हणाला.

"मग तुम्ही केलंत तरी काय? मिथिलनं चौकशीसाठी तर आधीच साफ नकार दिला होता." त्याच्या टिप्पणीवर नाराज होत मी म्हणालो.

"बग्स प्लांटींग! म्हणून तर तिथं काय चाललंय मला समजत होतं!"

"पण तुम्ही सिक्युरिटी कॅमेराजना अवॉईड केलंतच कसं?"

"सर्विलीयन्स कॅमेरा जॅमरच्या मदतीने!"

"ते आणि काय हाय?" मी वैतागानं विचारलं.

माझ्या रिएक्शनवर तो हसला. म्हणाला,

"कॅमेरा जॅमरच्या हाय फ्रिक्वेन्सीमुळं आपल्या आसपास तीस मीटरपर्यंतचे कॅमेराज् जॅम होतात. प्रिटी मस्ट द सेम लाईक सिग्नल जॅमर!"

"इज इट रियली पोसीबील?" मी शंकेनं विचारलं.

"वायर्ड कॅमेराज् असतील, तर नाही. पण वायरलेस कॅमेराज् वर ही ट्रिक वर्क होते. आणि मी आधी माहिती घेतल्यामुळं मला माहित होतं, की जॅमरने काम होईल."

"आणि कॅमेराज् वायर्ड असतेत, तर?"

"हॅकिंग करावं लागलं असतं इतकंच! त्या खोलीपर्यंत तर गेलो, पण आत मला जाता नाही आलं. म्हणून मला तिथं बग्स इन्स्टॉल नाही करता आले. मी मॅनेजरला आत काय आहे म्हणून विचारलं, तेव्हा त्यानं ते स्टोअर रूम असल्याचं सांगितलं आणि दाखवण्याचं टाळलं. म्हणून मी बाहेर का होईना, पण एक बग इम्प्लांट केलाच!"

"मग तुम्ही इतकं माहीत असून देखील मिथिलला का मोकळं सोडलंत? जेवढा मी तुम्हाला ओळखतो, तुम्ही कॉन्फरन्स ऐकल्या क्षणी त्याला संपवायला हवं होतं..."

माझं बोलणं ऐकून मिस्टर वाघनं स्मित केलं,

"तू मला एवढा ओळखतोस, तर तुला हे पण माहीत असेलच, की प्रत्येक गोष्ट मी योग्य वेळेवरच करतो. त्याला मारण्याची ती वेळ नव्हती. कंपनीत ती व्यक्ती कोण आहे जीला त्या बंद दरवाजामागे ठेवलंय आणि कशासाठी? हे शोधायचं होतं. मिथिलला व्हिएक्सचं प्रपोसल ज्यांनी दिलं त्या त्या लोकांनाही शोधणं मला गरजेचं होतं.

"हं! शिवाय खूप दिवसांनी खेळण्यासाठी एक लायकीची शिकार मिळाली होती! वाघ ती कशी सहजासहजी जाऊ देणार होता...!" असं म्हणत तो मोठ्यानं असुरी हसला.

ते हसू ऐकून माझ्या अंगावर काटा उभा राहिला... आतापर्यंतच्या आमच्या संभाषणात मी हे विसरूनच गेलो होतो, की मी 'गॉड ऑफ डेथ' सोबत चर्चा करतोय...

त्याच्या या हसण्याने मला याची आठवण करून दिली. आणि मी पटकन भानावर आलो. माझ्या लक्षात आलं, की मी तर त्याच्याच घरी बसलोय... जिथे अत्यंत विषारी साप त्याने घरी पाळून ठेवलेत...

हा विचार मनात येताच बाहेरील पावसाचा आणि मिस्टर वाघच्या हसण्याचा प्रचंड आवाज येत असताना त्यातूनही सापांची 'हिस्स्' माझ्या कानावर पडू लागली. ते माझ्या पायाशी रेंगाळत आहेत असा भास होऊ लागला. बाहेर प्रचंड मोठा पाऊस एव्हाना चालू झाला होता आणि मी त्या थंड वातावरणात सुद्धा घाबरून घामानं थबथबलो होतो... मी गारठलो तर होतो, पण थंडीने नाही, तर मरणप्राय भीतीने!

हे खूप डेडली कॉम्बिनेशन आहे... भितीमुळेच तुमचं बॉडी टेम्प्रेचर तर वाढलेलं असतं, पण त्याच भीतीमुळे एकाचवेळी तुम्ही गारठूनही गेलेले असता...!

"सूरज!" मिस्टर वाघनं मला हाक दिली.

तसा मी भानावर आलो. इतका, की मिस्टर वाघसमोर तोंड सांभाळून आणि प्रयत्न झालाच, तर आवळून बोलायला पाहिजे हे माझ्या लक्षात आलं. न जाणे कधी आपण देखील...

सापांचा आवाज हा माझ्या मनाचा खेळ होता आणि त्याचा थंड स्पर्श देखील; हे माझ्या ध्यानी आलं. सुटलेल्या थंड हवेमुळे पायाला गार वाटत होतं हे लक्षात आलं.

"सूरज!" त्यानं पुन्हा हाक मारली.

"अं?!" मी प्रतिक्रिया दिली.

"कुठं हरवलास?"

"नाही.. कुठं नाही... तुम्ही बोला..." मी म्हणालो.

"मिथिल इतका बेरकी आणि चलाख आहे, की त्याने मी त्याच्या ऑफिसमधून निघाल्यावर सर्व सर्विलीयन्स कॅमेराजची तपासणी करण्यासाठी आपल्या सिक्युरिटीला कामाला लावलं.

पण मी ज्या पिरियडमध्ये त्या ऑफिसमध्ये गेलो होतो, त्या पिरियडमध्ये काहीच रेकॉर्ड न झाल्याचं त्याच्या लक्षात आलं.

त्यानंतर त्यानं ताबडतोब सर्व कॅमेरे बदलून घेतले होते. आणि संपूर्ण ऑफिस व रिसर्च डिपार्टमेंटमध्ये तपास घेण्यास सिक्युरिटीला त्याने ऑर्डर दिली होती."

"मग त्यांना तुमची हिअरिंग डिव्हाइसेस सापडली नाहीत?"

"नाही! कारण मी ती लपवलीच अशी होती की सापडू नयेत!"

मिस्टर वाघच्या या सहज वाटणाऱ्या उत्तरावर मला समजलं, की मी मूर्खासारखा प्रश्न त्याला केला होता. मिस्टर विजय वाघ आहे तो! तो काहीही करू शकतो...!

"या नंतर सगळयात आधी त्यानं आपल्या सिक्युरिटी व सर्विलीयन्स ऑफिर्सना फायर केलं!

"मुळात मिस्टर वाघला सिक्युरिटीने आत सोडलंच का आणि स्क्रीन्सवर ब्लॅक आऊट झाल्यावर ताबडतोब त्याला माहिती देण्यात का आली नाही असा जाब मिथिलनं ऑफिसर्सना विचारला होता.

"त्यावर, 'वाघ हे पोलिसांकडून आले असल्यानं आणि त्यांना निशांत सर स्वतः घ्यायला गेटवर आले असल्यानं त्यांना अडवलं नाही असं सिक्युरिटी ऑफिसरनं त्याला सांगितलं' व त्याच्या सर्विलीयन्स ऑफीसरनं सांगितलं, की 'दुसऱ्या युनिटमध्येही हाच प्रॉब्लेम झाला होता म्हणून त्यानं टेक्निकल इन्कवायरी केली होती. शिवाय काही वेळातच सर्व कॅमेरे पूर्ववत काम करू लागले होते. म्हणून त्याला काही गंभीर आहे असं नाही वाटलं...'

"त्यांच्या स्पष्टीकरणावर समाधानी न होऊन मिथिलनं सिक्युरिटी व सर्विलीयन्स ऑफिसर्सना कामावरून हाकलून लावलं."

"थिस मिथिल मॅन मस्ट बी डेंजरस...!" मी विचारांत हरवून बोलून गेलो.

"इतका, की तू विचारही नाही करू शकत!" मिस्टर वाघ निष्काळजीपणे स्मित करत माझ्याकडं रोखून पाहत बोलला...

आणि मग वर छताकडं रोखून कुठं तरी हरवल्यासारखा पाहत तो उद्गारला,

"सिदात!"

# ७.

आता मिथिलचं नेक्स्ट टार्गेट कोण आहे हे मिस्टर वाघला माहीत होतं! रादर् मिथिलसाठी त्यानं स्वतःच ते सेट केलं होतं.

दरम्यान मिस्टर वाघचं नेमकं काय चालू आहे हे हजारेला मात्र काही उमगत नव्हतं. तो अक्षरशः वैतागला होता. फिफ्टी प्रसेन्ट पेयमेंट त्यानं मिस्टर वाघला आधीच केलं होतं आणि असं असून ठोस असं काही मिस्टर वाघ करत असल्याचं (त्याच्या दृष्टिकोनातून तरी) त्याला दिसत तर नव्हतं.

मिस्टर वाघनं त्याला सतत रिपोर्टिंग करावं असं त्याचं म्हणणं होतं. जे मिस्टर वाघ कधीच करणारा नव्हता...

"तुमचं काय चाललंय काही कळत नाही मिस्टर वाघ!" तो रागातच मिस्टर वाघला बोलला.

यावेळी मिस्टर वाघनं स्वतःच स्वतःला मिलींद हजारेच्या घरी जेवणासाठी आमंत्रित केलं होतं आणि हजारे नाईलाजाने त्याला जेवू घालत होता...

घास तोंडाजवळ नेत काही न बोलता मिस्टर वाघनं हजारेकडं पाहिलं आणि भाकरीच्या शेवटच्या तुकड्याचा केलेला घास त्यानं तोंडात सरकवला.

'आपण काहीच बोलणार नाही!' हे त्यानं त्याच्या या कृतीतून हजारेला दर्शवलं होतं. त्यामुळं हजारेचा अधिकच जळफळाट झाला, पण त्याची बायको एव्हाना स्वयंपाक घरातून बाहेर येऊन मिस्टर वाघला भात वाढत असल्यानं त्याला राग व्यक्त करता आला नाही. तो मूठ आवळून शांत

बसला. त्याच्या या कुचंबनेवर मिस्टर वाघ हसला. त्याच्या अशा अचानक हसण्यानं हजारेची बायको वाढायचं थांबली.

"नाही. काही नाही. एक जोक आठवला." म्हणत 'वाढा' असं सांगण्यासाठी त्यानं ताटाकडं खूण केली.

'किती खातोय हा भुक्कड! भस्म्या झालाय का याला? तिकडं पैसा खातोय आणि इकडं जेवण हादडतोय हरामखोर! काम तर काडीचं करत नाहीये. आपणच पायावर धोंडा मारून घेतलाय...' हजारे दात खात पुटपुटत होता.

पण त्याच्या रागाची इंटेन्सिटी इतकी होती, की त्याचे ओठ हालत होते. म्हणून लीप रिडींग एक्सपर्ट असलेल्या मिस्टर वाघ पासून त्यांचं बोलणं लपलं नाही.

आणि हजारेकडं पाहून हसतच भाताचा घास त्यानं तोंडात भरला...

"जेवण छान झालं होतं!" म्हणत त्यानं ओले हात नॅपकिनला पुसले. आणि एक मोठ्या रकमेचा चेक लिहून त्यानं हजारेच्या बायकोसमोर धरला.

'हे काय?' या अर्थानं ती मिस्टर वाघाकडं पाहू लागली.

"आपल्याकडं परान्न वर्ज्य मानलं आहे. म्हणून काही तरी भेट देण्याची प्रथा आहे. गृहस्थानं फुकट खाऊ नये. म्हणून ही छोटी भेट!" तो हसत म्हणाला.

आणि त्यानं तो चेक घेण्यास हजारेच्या बायकोला भाग पाडलं. म्हणाला,

"अन्नपूर्णेचा किती सम्मान करावा तितका कमी. पण कुवती प्रमाणं करतो. स्वीकारा." म्हणत त्यानं चेक तिच्या हातात अक्षरशः कोंबला.

असं म्हणून त्यानं भेट म्हणून जरी हे पैसे दिले असल्याचं वरकरणी दिसत असलं, तरी पैसे देण्यामागचं त्याचं खरं कारण काय, याचा अंदाज मला आला होता...

ऋण चढण्याआधीच तो ते फेडू पाहत होता...

संध्याकाळ झाली होती. आमच्या हातातील चहा कधीच गार झाला होता. बोलणं चालू झाल्यानंतर दोघांनीही एकही घोट घेतला नव्हता. साडे सात वाजून गेले होते. मोठ्या पावसामुळे अंधारून तर कधीच आलं होतं. आईला काळजी नको म्हणून मग मिस्टर वाघनं मला माझ्या घरी सोडलं.

आठ दहाला मी माझ्या गल्लीच्या कॉर्नरला होतो. मला तेथेच सोडून मिस्टर वाघ निघून गेला होता. पावसाची रिपरिप चालूच होती, पण भिजण्यासारखा पाऊस नव्हता.

आजही बरेच प्रश्न अनुत्तरित राहिले म्हणत मी रात्र जागूनच काढली...

बाहेर विजांचा कडकडाट चालू होता... आणि माझ्या आतही तुफान उठलं होतं... प्रश्नांचं... न उलगडणाऱ्या कोड्यांचं...

केवढा तो गुंता... वरून दिसताना सगळं तर किती सहज सोपं दिसत होतं...

गुन्हेगार कोण आहे हे देखील माहीत होतं...

पण माणसं का मारली जाताहेत हे कळत नव्हतं...

नर्व एजंट ही काय भानगड होती? आणि खरंच ते इतकं घातक आहे का, की आपला जीव गमावला तरी बेहत्तर! पण असलं काही आपल्या कंपनीत बनवू द्यायचं नाही असं बोर्ड मेंबर्सनी ठरवलं होतं...?

मुळात बोर्ड मेंबर्स् शांतच का होते? का नाही त्यांनी त्यांच्या एमडी विरुद्ध शासन-प्रशासनाकडे धाव घेतली? नुसता विरोध दर्शविला म्हणजे झालं असं नाही ना होतं... मरणाची भीती म्हणून ते गप्प असतील का? पण तसेही ते मरणारच होते. हे त्यांच्या कसं लक्षात आलं नाही... लोकांच्या आणि पर्यायाने त्यांच्याही सुरक्षेचा हा प्रश्न होता...

मरणाच्या भीतीनं सारासार विचार करण्याची शक्ती माणूस गमावतो हेच खरं...

शिवाय काही अज्ञात अतिरेकी ताकदी या सगळ्यामागचं मूळ होत्या का? तेही कळायला सध्या मार्ग नाही!

आणि सिदात...?

ते एक काय प्रकरण होतं?

शिवाय या सगळ्याचा हानियाशी काय संबंध?

कशाचीच लिंक लागत नाही...!

सगळं कसं 'जिगसॉ पजल' सारखं आहे! तुकडे तर सगळे समोर आहेत, पण ते जोडायचे कसे; ते मात्र समजत नाहीये...

आणि दुसऱ्या दिवशी मी पुन्हा मिस्टर वाघच्या घरी पोहोचलो. ते सारे प्रश्न डोक्यात घेऊन. त्यांची उत्तरं मिळवण्याच्या लालसेनं मला मिस्टर वाघच्या घराकडं खेचलं होतं...

मी गेट उघडलं. मिस्टर वाघच्या घरचं गेट उघडताना मला मी यमलोकाचा किंवा भूत बंगल्याचा दरवाजा खोलतोय की काय असा नेहमी भास होतो... मी लॉन पार करून मुख्य दरवाजा पाशी पोहोचलो. तो फक्त पुढं केलेला होता...

बरोबरच आहे म्हणा! यांच्या घरात शिरण्याचं धाडस कोण करणार?!

मी दाराला हात लावला, तसं दार आतल्या बाजूला उघडलं.

"आत ये!" मिस्टर वाघचा आतून जोराचा आवाज आला.

मी आत प्रवेश करता झालो. पाहतो तर काय, मिस्टर वाघ त्याच्या नेहमीच्या जाग्यावर बसून नागाच विष काढत होता.

नागाच्या तोंडाकडं बघतच त्यानं मला आत येऊन बसण्याचा इशारा केला. मी हललो होतो त्या नागाला पाहून. जागीच खिळलो होतो.

"तुला माहिती आहे याचं सायंटिफिक नेम काय आहे?" त्यानं माझ्याकडं न बघताच विचारलं.

'मला जाणून घेण्यात काही इंटरेस्ट नाही! हा नाग आहे एवढं मला पुरेसं आहे!' असं मी म्हणालो; पण मनातल्या मनात.

त्यानं वर पाहिलं. माझ्या चेहऱ्यावरची भीती बघून त्यानं आपलं काम थांबवलं आणि त्या नागाला पेटीत ठेऊन ती पेटी भिंती लगतच्या टेबलावर ठेऊन दिली. परत पहिल्या जागेवर येत तो म्हणाला,

"इंडियन कोब्रा रेकग्नाईझ्ड् एज ट्रु कोब्रा. वन ऑफ द मोस्ट वेनमस स्नेक्स ऑन अर्थ! सायंटिफिक नेम 'नाया नाया' ऑर 'नाजा नाजा'! व्हॉट ए ब्युटीफुल क्रिएचर! मला कळत नाही तू यांना इतकं का घाबरतोस?" बसत तो मला म्हणाला.

'हा बोलायचं म्हणून बोलतो का? विषारी सापांना कोण नाही घाबरत?' मी वैतागानं मनाशी बोललो. आणि क्षणात चपपलो!

'हे... हे विष तो कोणासाठी काढतोय... माझ्यासाठी तर... नाही...?

'नाही! म्हणजे नसावं...! असं असू शकत नाही!

'मिस्टर वाघच्या घरी आल्यावर किंवा त्याला असं काहीतरी करताना पाहिलं, की डोकं असं काहीतरी भलतंच विचार करत राहतं... मी काय केलंय? काहीच तर नाही... मग... मग मी का भिऊ...?'

स्वतःला समजावत मी त्याच घाबरल्या अवस्थेत त्याच्यासमोर बसलो. खाली बघत... कुठं तरी हरवून त्याचं बोलणं चालूच होतं,

"खरी विषारी जात कुठली ठाऊक आहे?" त्यानं विचारलं. पण नेहमीप्रमाणे माझ्या उत्तराची वाट न पाहता त्यानंच उत्तर दिलं. म्हणाला,

"माणसाची!"

मी दचकून वर त्याच्याकडं बघितलं. तो कुठं तरी हरवल्यासारखा कुठं दुसरीकडंच पाहत बोलतच होता...

"साप कितीही विषारी असला, तरी तो विनाकारण कोणाच्या वाट्याला जात नाही! ना आपल्याकडील सामर्थ्याचा त्याला गर्व असतो! पण या उलट माणूस! काही नसताना अहंकाराने आंधळा झालेला! संधी मिळताच फसवेल! आणि त्याच्यावरच कसा अन्याय झालाय अशी उलट बोंब ठोकेल...! अत्यंत विषारी; माणूस...!" तो बोलायचं थांबला.

आजही तो वेगळ्याच मूडमध्ये दिसत होता. त्यामुळं त्याला पुढं कंटीन्यू करण्यास सांगावं, की नको हे मला कळेना...

तो नेहमीच असा काहीतरी सांगता - सांगतामध्येच कोशात जातो. एकटेपणामुळं त्याला असं होतं असेल का? पण नाही! तसंही असू शकत नाही! कारण तो तटस्थ आणि स्थीर बुद्धीचा माणूस आहे. तो असा ढळूच शकत नाही!

मग लक्षात येतं, की खूप जग बघितलंय यानं! खूप चित्र-विचित्र अनुभव घेतलेत. असं ज्यावेळी लक्षात येतं; त्यावेळी त्याचं असं असंबद्ध बोलणं विनाकारण वाटत नाही...!

मी शांत होतो. आणि मिस्टर वाघही. मग त्यानेच शांतता भंग केली. म्हणाला,

"लेट्स स्टार्ट! त्याशिवाय तुला तुझी कथा पूर्ण करता येणार नाही!"

आणि त्यानं पुढं सांगायला सुरुवात केली...

# ८.

एकाचवेळी दोन ठिकाणी लक्ष ठेवता येणार नाही म्हणून मिस्टर वाघनं मिलींद हजारेला निशांत पुरोहितवर लक्ष ठेवण्यासाठी सांगितलं.

"आणि तुमच्या माणसाला कामाला लावू नका! तुम्ही पर्सनली त्याच्या मागावर रहा!" मिस्टर वाघ हजारेला म्हणाला.

"पण का? इज ही अ परपेट्रेटर्?" हजारेनं विचारलं.

"कळेल लवकरच!" मिस्टर वाघ गंभीरपणे म्हणाला.

"आणि तुम्ही काय करणाराय?"

"दुसरं एक काम आहे!"

"मिस्टर वाघ! माझं जर काम झालं नाही, तर तुम्हाला खूप महागात पडेल एवढं ध्यानात ठेवा! तुम्ही काही काम करताय, असं मला तर वाटत नाही! आताही तुम्ही मलाच कामाला लावताय! एवढे पैसे तुम्ही घेतलेत ते कशासाठी?" हजारेनं मिस्टर वाघवर चिडून त्याला सुनावलं.

"तुम्हाला माझी वर्किंग प्रोसेस पटत नसेल, तर तसं सांगा. मी आत्ता ही केस सोडतो! पण पैसे रिफन्ड होणार नाहीत एवढं मात्र लक्षात ठेवा!"

"तुम्ही...!" हजारे भयंकर चिडला. पण त्याला मिस्टर वाघनं वाक्य पूर्ण करू दिलं नाही. म्हणाला,

"तुम्ही माझं काही बिघडवू शकत नाही! उलट मीच तुमच्या काळाबाजारीचा कच्चा चिठ्ठा तुमच्या सुपिरिअर्ससमोर ठेऊ शकतो! त्यामुळं तोंड बंद ठेवायचं आणि सांगतोय ते करायचं!"

हजारेकडं यावर बोलण्यासारखं काहीच राहिलं नव्हतं. तो मूग गिळून गप्प बसला.

मिस्टर वाघनं यावेळी काही हिअरींग डिव्हाईस व स्पाय कॅम्स हजारेवर इम्प्लॉट केले.

"यामुळं आपण कनेक्टेड राहू आणि तुमच्या सोबत काय काय चालू आहे ते देखील मला कळत राहील. डोन्ट यू डेअर टू रिमुव्ह दीज्! आदर वाईज युअर फाईल विल बी इन सुपेरिटेन्डेन्स्ेस हँड्स!"

हजारेनं नाराजीनं नुसतीच मान हलवली!

"कपडे बदलले, की त्या कपड्यांवर देखील हे कॅरी करायचं!" मिस्टर वाघनं त्याला धमकी वजा ताकीद दिली.

"हो!" हजारे फक्त इतकंच म्हणाला आणि त्याच्या मिशनवर निघाला!

'आपण स्वतः कुऱ्हाडीवर पाय मारलाय!' असंच त्याला वाटत असणार याची मला खात्री आहे. (मला माहित आहे, मी पुन्हा पुन्हा हे रिपीट करतोय, पण हजारेची अवस्था मीच चांगल्या प्रकार समजू शकतो...)

"तुम्ही नुसत्या ब्लुटूथनं पण त्यांच्याशी कनेक्टेड् राहिलाच असता. मग ते रेडिओ डिव्हाइसेस तुम्ही त्याच्यावर का लावलेत?"

"मित्च्! तुझे प्रश्न काही संपत नाहीत! प्रत्येक गोष्ट तुला एक्स्प्लेन करावी लागते..."

"सांगा!" मी त्याला थांबवत म्हणलो.

"कारण तो काय करतोय, त्याच्यासमोर काय होतंय ते मला जाणून घ्यायचं होतं, पण माझ्यासोबत काय होतंय, मी काय करतोय हे त्याला मला कळू द्यायचं नसतं. ब्लुटूथ वापरलं असतं, तर मी काय करतोय ते त्याला कळत गेलं असतं. एवढं सिम्पल आहे हे!" असं म्हणत त्यानं माझी अक्कल काढली.

तिकडं हजारे निशांतच्या घरावर पाळत ठेवण्यासाठी निघाला, तर इकडं मिस्टर वाघ मिथिलच्या मागावर गेला...

मिथिल रात्री बारा तीसला घराबाहेर पडला. एकटाच ड्राईव्ह करून तो कोठेतरी चालला होता. मिस्टर वाघही त्याच्या कस्टमाईज्ड '69 फोर्ड मस्टँग'नं त्याचा पाठलाग करू लागला.

मिथिलला फॉलो करत असताना त्यानं हजारेवर बसवलेली डिव्हाईसेस गाडीच्या स्क्रिनला ब्लुटूथ कनेक्टिव्हिटीनं जोडली (हॅकिंगची भीती नको म्हणून तो सहसा अशा कामात वायफाय वापरायचं टाळतो). आणि आता हजारे जे काही पाहत व ऐकत होता ते मिस्टर वाघ देखील त्याच्या गाडीच्या स्क्रिनवर पाहू आणि ऐकू शकत होता.

त्याला दिसत होतं, की एक गाडी येऊन एका माणसाला त्यातून बाहेर टाकण्यात आलं आणि ती गाडी निघून गेली. त्या व्यक्तीनं आपलं डोकं जोरात दाबून धरलं होतं. जणू असह्य वेदना त्याला होत आहेत. तो मानेला, डोक्याला जोरात झटके देऊ लागला. लडखडत पुढं जाऊन तो समोरील घराच्या दरवाजाला धडकला. आणि तो वाढत जाणाऱ्या वेदने पुढं हताश होऊन आपलं डोकं जोरजोरात त्या दरवाजावर आदळू लागला...

दरवाजाच्या आवाजानं आतून दरवाजा उघडला गेला. दरवाजा उघडणारा व्यक्ती कपड्यांवरून नोकर आहे ते दिसत होता. तो समोर येताच त्या व्यक्तीला काय झालं कोणास

ठाऊक, पण एका जनावरासारखा तो त्याच्यावर झपटला आणि त्यानं त्याला त्याच्याकडील चाकूनं मारून टाकलं. त्या नोकराला बाजूला फेकून मग ती व्यक्ती घरात शिरली. कदाचित त्याला होणाऱ्या वेदना चालूच असाव्यात. कारण तो रक्तानं माखलेल्या हातानं डोकं दाबून धरून लडखडत आत गेला होता...

हे सगळं पाहून हजारे। इतका सुन्न झाला होता, की काय करावं हे अचानक घडलेल्या या घटनेनं त्याला उमगलंच नव्हतं. त्यामुळं त्या नोकराला वाचवायला तो पुढं झाला नव्हता.

पण आता मात्र तो सावरला. आणि त्या घरात शिरला.

आत, तो पाहत होता, की एक स्त्री खाली रक्ताच्या थारोळ्यात पडली आहे आणि त्या व्यक्तीनं निशांतला पकडून त्याच्या मानेवर चाकू ठेवला आहे आणि तो असंबद्ध काही तरी बडबडत आहे...

"नो लेफ्टनंट! नो! आय विल नॉट लेट यू टू डू दॅट! नो... डाय! यू डिजर्व थिस लेफ्टनंट!..."

हे पाहून हजारेची भंबेरीच उडाली होती. तसा तो घाबरट नव्हता. पण सगळं कसं अनपेक्षितच त्याच्यासमोर घडत होतं. त्यामुळं तो जरा गोंधळला होता. तरी त्यानं हिंमत करून त्याची पिस्टल बाहेर काढली होती!

"स्टॉप अँड लिव्ह हिम!" त्यानं त्या व्यक्तीला ऑर्डर दिली.

पण त्या व्यक्तीनं काही न ऐकता निशांतचा गळा चिरला. हे पाहून हजारेनं त्या व्यक्तीवर गोळी चालवली...

.......................................................................................................................................

गोळी लागल्यानं; का तिच्या आवाजानं कळलं नाही, पण ती व्यक्ती खाली कोसळली आणि अचानकच भीषण शांतता पसरली...

सगळं संपलं होतं. कदाचित; तात्पुरतं... पण तितकंही थोडं नव्हतं... मिस्टर वाघनं स्क्रिन वरून नजर हटवली. त्याच्या लक्षात आलं, की मिथिलची गाडी स्लो झाली होती. आणि ती थोडं अंतर जाऊन एका मोडकळीस आलेल्या बिल्डिंग बाहेर थांबली होती.

मिस्टर वाघनं जरा दूरच आपली गाडी उभी केली. जेणे करून मिथिलला संशय येऊ नये. आत काय चालू आहे हे तो त्याच्या गाडीत बसून बघत-ऐकत होता...

"एक मिनिट!" मी मिस्टर वाघलामध्येच थांबलं.

"तूझे वाचक तुझ्यावर वैतागत असतील नाही? तू इंटरेस्टिंग प्लॉट आला की थांबवतोस! तुझ्या संपादकांकडं खूप तक्रारी येत असतील तुझ्या." तो मला चिडवण्यासाठी बोलला.

"नाही त्यांना मी लिहिलेलं आवडतं! आणि मी फ्रीलान्स काम करतो!" मी त्याला गप्प करण्याचा प्रयत्न केला.

"बरं बोल. काय अडकलंय?" त्यानं मला शंका विचारायला परवानगी दिली.

"तुम्ही मिथिलवर कधी कॅमेरा आणि रेडिओ इंप्लान्ट केलात?"

माझ्या प्रश्नावर तो काही बोलला नाही. फक्त त्यानं त्याचा स्मार्ट टीव्ही ऑन केला. त्या टीव्हीवर मला मी आणि मिस्टर वाघ समोरासमोर बसलेले दिसत होतो.

"तुझ्यासमोर काही घोगावतंय का?"

मिस्टर वाघनं असं विचारल्यावर मला जाणवलं, की खरंच माझ्या डोळ्यासमोर काही तरी घोंगावत होतं. मी त्यावर फोकस केलं. एक मधमाशी माझ्यासमोर घोंगावत होती. ती जशी माझ्या दिशेनं उडत आली, तसा माझा चेहरा टीव्हीवर मोठा होऊ लागला. मी हात पुढं केला आणि ती मधमाशी माझ्या तळहातावर बसली. मी त्याला जवळून पाहिलं, तर ती पूर्णपणे मेटॅलिक होती.

म्हणजे, ती मधमाशी, खरं तर एक टायनी कॅमेरा होता.

'स्ट्रेंथन इंटरनॅशनल्स' ही कंपनी माझ्यासाठी अशी डिव्हाइसेस बनवते.

"स्ट्रेंथन इंटरनॅशनल्स तर सरकारसाठी काम करते. मग तुम्हाला कसं...?"

"मी त्यांचा शेअर होल्डर आहे. मी इन्वेस्टीगेटर असल्यानं टेस्टिंगसाठी ही मला पुरवली जातात."

'म्हणजे त्यांना माहीत असतील तुमचे उद्योग?' असं मला विचारायचं होतं, पण मी खूप सौम्य शब्दात विचारलं, की -

"मग त्यांना तुम्ही काय करता ते माहीत असेल?"

माझ्या प्रश्नावर तो हसला. म्हणाला,

"नाही! कारण त्यांनी काही जरी मला टेस्टिंगसाठी दिलं, तर आधी मी ते मॉडीफाय करतो."

"तुम्ही त्याच्या उपकरणाशी छेडछाड करता हे त्यांना समजत नाही?" मी परत शंका विचारली.

"ही डिव्हाइसेस माझ्यासाठीच बनवलेली असतात. त्यामुळं एकदा का मी त्यांना रिपोर्ट दिला, की त्यानंतर मी यांच्याशी काय करतो याचा ते फार विचार करत नाहीत. अनलेस जोपर्यंत याचा चुकीचा वापर होत नाही. शिवाय गोपनियतेच्या नावाखाली मी त्यांना मला कधी ट्रॅक न

करण्याची ताकीद दिली आहे! म्हणून काही जरी छेडछाड केली तरी ते लोक ऑब्जेक्शन घेत नाहीत!"

"पण कशावरून त्यांनी तुमची माहिती ठेवली नसेल? नॅशनल सिक्युरिटीच्या बाबतीत ती कंपनी खूपच कटिबद्ध आहे असं मी ऐकलंय!"

"हो बरोबराय तुझं. म्हणूनच एक दिवस मी त्यांचा सगळा डेटाबेस चेक केला होता. माझी कोणतीच माहिती त्यांच्याकडं नसल्याचं मला दिसून आलं. आपली मॉरल्स सांभाळणारी कंपनी आहे ती! त्यामुळं त्या बाबतीत मी निर्धास्त आहे!"

गाडीतील स्क्रिनवर मिस्टर वाघ पाहत होता, की सहा लोकांची 'गोलमेज परिषद' भरली होती. त्यांतील एकाला हार्टचा त्रास असावा, कारण तो पोर्टेबल ऑक्सिजन सिलेंडर सोबत घेऊन होता आणि ऑक्सिजन मास्क त्यानं तोंडाला घातला  होता. ते बोलत होते... खरं तर मिथिलच बोलत होता,

"नाऊ वी आर रेडी टू प्रोड्युस द नर्व गॅस यू वॉन्ट. विदाऊट एनी हर्डल्स. आवर पाथ इज नाऊ इजी अँड क्लिअर! अँड फॉर दॅट, आय अल्सो रजिस्टर्ड् अ पेस्टीसाईड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी. सो वी कॅन प्रोड्युस दि नर्व एजंट्स ॲट व्हेरी लार्ज अमाऊंट अँड नोवन विल नो दॅट एवर!"

("तुम्हाला जो नर्व गॅस हवाय त्याची निर्मिती लवकरच सुरू होईल. कोणत्याही अडथळ्यांशिवाय. आपली वाट आता सोपी आणि मोकळी झाली आहे. त्यासाठी मी एका पेस्टीसाईड मॅन्युफॅक्चरिंग कंपनीचं रजिस्ट्रेशन केलं आहे. या कंपनी अंतर्गत आपण खूप मोठ्या प्रमाणात नर्व एजंट्स तयार करू शकतो. आणि कोणाला संशयही येणार नाही!")

मिथिलचं हे बोलणं ऐकताच मिस्टर वाघ गाडीतून खाली उतरला आणि त्या बिल्डिंगच्या एंटरन्सपाशी गेला.

तेव्हा त्याला बाहेरच थांबवण्यात आलं. पण मिस्टर वाघनं त्या व्यक्तीची कम्प्रेसर लावलेली 'ग्लॉक सेवेन्टीन' सेमी ऑटोमॅटिक पिस्टल हिसकावून घेऊन त्याला अडवणाऱ्या व्यक्तीला तिच्याच गननं गोळी मारली.

अगदी पॉईंट ब्लॅन्क! गनला कम्प्रेसर असून देखील आवाज झालाच.

(मला आठवतंय एकदा मी मिस्टर वाघला विचारलं होतं, की "फिल्म्समध्ये गन्सना सायलेन्सर लावलेलं दाखवतात. तर त्यानं खरंच आवाज थांबतो?"

यावर तो मोठ्यानं हसला होता. त्यानं सांगितलं, की "देअर इज नॉट सच थिंग लाईक सायलेन्सर. गन्सना आवाज कमी करण्यासाठी जे लावतात, त्याला कम्प्रेसर म्हणतात. पण ते असूनही गन्स चालवली की बऱ्यापैकी आवाज होतोच!")

यामुळं मिस्टर वाघनं त्या व्यक्तीवर गन चालवल्यावर आतील लोकांना त्याचा आवाज नक्कीच ऐकू गेला असणार आणि ते सावध देखील झाले असणार हे नक्की!

पण मिस्टर वाघनं त्यांना बाहेर येण्याची संधीच दिली नाही. त्यानं एक स्मोक बॉम्ब रिलीज करून आत सोडला आणि दार बाहेरून लावून घेतलं. आणि आपली मस्टँग घेऊन ती जागा त्यानं सोडली...

# ९.

"तुम्ही त्या बिल्डिंगमधे काय फेकलंत?" मी विचारलं.

या सलग घडणाऱ्या आणि विलक्षण घटना ऐकून माझा श्वास रोखला गेला होता. रिलीफ मिळावा म्हणून मी मिस्टर वाघला प्रश्न केला. मला जाणून पण घ्यायचं होतंच, की त्यानं काय कारभार केलाय...

"त्यांना नर्व 'व्हिएक्स' हवं होतं. ते दिलं!" तो सहज म्हणाला.

"म्हणजे? आणि हे व्हिएक्स, हे नर्व एजंट्स... काय भानगड काय आहेत?" मी कपाळावर आठ्या आणत विचारलं.

"नर्व एजंट्स आर केमिकल वेपन्स!" त्यानं शाब्दिक बॉम्ब फोडला,

"व्हिएक्स हा त्यातील एक अत्यंत विषारी प्रकार! शॉर्टफॉर्म फॉर 'वेनमस एजंट एक्स' केमिकल फॉर्म्युला $C_{11}H_{26}NO_2PS$! लिक्विड, क्रीम व गॅस फॉर्म्समध्ये हे आढळतं. हे एक अत्यंत प्राणघातक असं नर्व एजंन्ट आहे. संयुक्त राष्ट्रानं मोठ्या प्रमाणावर विनाश करण्यारं शस्त्र म्हणून याचं वर्गीकरण केलंय!

"हे केमिकल नर्व्हस सिस्टीमवर अटॅक करतं आणि ते बंद पाडतं. ज्यामुळं मृत्यू होतो. सुरूवातीला मळमळ होते, चक्कर येते. आणि लगेच व्यक्ती आचके देऊ लागते आणि श्वास बंद होतो आणि पंधरा मिनिटांतच मृत्यू होतो!"

"हे किती भयानक आहे... आणि तुम्ही ते घरी बनवलंत?" मी घाबरून विचारलं.

"मग काय झालं त्यात!" तो स्माईल करत म्हणाला.

मी लगेच नाक आणि तोंड दाबून धरलं. यावर तो मोठ्यानं हसला. म्हणाला,

"अरे! ते काय इथं पसरलेलं नाही! नाही तर मी इथं तुझ्याशी बोलत बसलो असतो का?"

मी रिलॅक्स होत नाकाचा हात हळूहळू बाजूला घेतला.

"यू नो व्हॉट? यू आर इनोसेंट! म्हणूनच मला तू आवडतोस!" तो मोहक स्मित करत माझ्याकडं पाहत मला म्हणाला.

"तुला माहितीय हे कुणी बनवलंय?"

मी नकारार्थी मान हलवली. हे काय आहे हेच माहीत नाही, तर हे कोणी बनवलंय हे काय माहीत असणार मला? पण काही तरी सांगण्याची सुरवात मिस्टर वाघ या प्रश्नानं करतो.

"याचा शोध एका यूके बेस्ड् इंडियन केमिस्ट रणजित घोष यांनी लावलाय!"

"काय एक भारतीय? पण आपण तर विश्व शांततेवर विश्वास ठेवतो. मग?" मी गोंधळलो होतो.

"त्यांनी डिस्ट्रक्शनसाठी हे बनवलंच नाही. नोव्हेंबर नाइंटिन फिफ्टी टूला इम्पीरियल केमिकल इंडस्ट्रीज मध्ये काम करत जे. एफ. न्यूमनसह त्यांनी व्ही-सिरीज नर्व एजंट डिस्कव्हर केला, पण पेस्टींसाईड म्हणून. पण मानवासाठी हे घातक आहे असं समोर आल्यावर नाइंटिन फिफ्टी फाईव्हला या सिमिलर कम्पाऊंडवर कमर्शिअल रिसर्च सील करण्यात आला होता.

"पुढं सिक्सटी वनला अमेरिकेनं न्यूपोर्ट केमिकल डेपो अंतर्गत व्हिएक्सची मोठ्या प्रमाणात निर्मिती चालू केली. एटी एटला यूएनच्या तपासात क्युबाने अंगोलन गृहयुद्धात याचा वापर केल्याचं आढळून आलं. त्याच वर्षी सोळा मार्चला इराण-इराक युद्धात इराकने कुड्र्सवर सद्दाम हुसेनच्या नेतृत्वाखाली केमिकल एजंट्सचा वापर केल्याचे पुरावे आहेत. कुर्डिस्तान हा पश्चिम

आशियातला इराणीयन वंशीय देश आहे. या हल्ल्याला हलाबजा केमिकल अटॅक, हलाबजा मॅसेकर किंवा ब्लडी फ्रायडे ही म्हणतात.

"अजून बऱ्याच अशा घटना आहेत. रिसेन्ट इन्सिडेंट सांगायचा झालाच, तर तेरा फेब्रुवारी दोन हजार सतराला नॉर्थ कोरियाचा लीडर किम जॉन्ग-उनचा सावत्र भाऊ किम जॉन्ग-नामला मलेशियाच्या क्वालालांपूर एअरपोर्टवर व्हिएक्सचा वापर करून मारण्यात आलं!"

व्हिएक्सचा सगळा इतिहास सांगून तो बोलायचा थांबला.

"मग त्या बिल्डिंग मधले सगळे मेले असतील?"

माझ्या प्रश्नावर तो पुन्हा हसला,

"दुसरा त्यांच्याकडं काही पर्याय होता का?" तो म्हणाला आणि त्यानं पुढं सांगायला सुरुवात केली...

"मिस्टर वाघ! ऐनवेळेला तुम्ही सांगितलं म्हणून. नाही तर मी याच्या डोक्यावरच नेम धरला होता!" गाडी चालवत हजारे बाजूच्या पॅसेंजर सीटवर बेशुद्ध पडलेल्या त्या व्यक्तीकडं पाहत मिस्टर वाघला म्हणाला.

मिस्टर वाघ हजारेच्या 'पॉईंट ऑफ व्ह्यू'नं त्या व्यक्तीला त्याच्या गाडीच्या स्क्रिनवर पाहत होता.

"त्याला पोलीस स्टेशनला नेऊ नका." म्हणत मिस्टर वाघनं भेटण्याचं ठिकाण हजारेला वायरलेसच्या माध्यमातून सांगितलं.

ठरलेल्या ठिकाणी दोघं भेटले.

"सीन्स यू गॉट युअर क्रिमिनल, नाऊ पे माय रिमेनिंग अमाऊंट!" मिस्टर वाघनं हसत आपल्या पैशांची मागणी केली.

"मला वाटलेलं तुम्ही काही मदत करत नाही आहात! बट यू रिअल वर्क्ड् वेल! नाईस! म्हणत त्यानं उरलेली रक्कम लगेच मिस्टर वाघच्या अकाऊंटला जमा करायला सुरुवात केली...

"निशांत, त्याची बायको आणि नोकर यांचे साठ लाख एड करायला विसरू नका... आणि मिथिलचे पन्नास पण." चेहऱ्यावर हावरेपणा दाखवत मिस्टर वाघ हसत म्हणाला.

"मिथिल भारद्वाज? का?" हजारेनं थांबून विचारलं.

"तोच तर खरा सुत्रधार आहे या सगळ्याचा!"

"मग चला तर. लगेच पकडूया त्याला!"

"नाही नको! आधी या माणसाला शुद्धीवर येऊ देत. याची जबानी घेतली, की आपल्याकडे ठोस पुरावा असेल मिथिलला आत घ्यायला!" मिस्टर वाघनं त्याला पटवलं.

"तुम्ही ठीक बोलताय! तसंच करू मग." हजारे मंजूर झाला.

"पण मिथिलचे पैसे मात्र आत्ताच हवेत!" मिस्टर वाघ हावरट हसला.

"तुमची भूक काही संपत नाही!" हजारेही हसून म्हणाला.

"इफ यू गुड ऍट समथिंग, नेव्हर डू इट फॉर फ्री! असं ख्रिस्तोफर नोलान यांनी म्हंटलच आहे!" मिस्टर वाघ परत लोभी हसला.

"द डार्क नाईट. जोकरचं वाक्य आहे ना? माझीही आवडती फिल्म आहे. म्हणूनच मी पण कोणाचं काम फुकट करत नाही." हजारे पण हसून म्हणाला.

म्हणत हजारेनं पैशांचं ट्रांजेक्शन पूर्ण केलं.

"ऑन लाईन पेयमेंट करताय भीती नाही वाटत?" मिस्टर वाघनं विचारलं.

"आता तुम्ही लगेच पैसे मागताय म्हणून केलं ऑनलाईन. याच्याआधी ऑनहॅन्ड दिलेच की!"

"तरी?" मिस्टर वाघनं खोटी भीती दाखवली.

"तुम्ही काळजी करू नका ओ! एन्जॉय! माझं अकाऊंट स्टेटमेंट होम मिनिस्टर सोडले, तर कोण चेक करणार आहे? मी सांभाळून घेईन!" हजारे मिस्टर वाघला खात्री देत म्हणाला.

"होम मिनिस्टर?" मिस्टर वाघनं खोटं घाबरून प्रश्न केला.

"आमची बायको ओ!" हजारे हसत म्हणाला.

हे ऐकून मिस्टर वाघ देखील हसू लागला.

"मग पार्टी?" मिस्टर वाघनं विचारलं.

"हो चला ना! कोणत्या बारला?" हजारेनं विचारलं.

"बारला कशाला येताना घेऊनच आलोय." म्हणत मिस्टर वाघ त्याच्या कारकडं गेला.

हाताला ग्लव्हज् घालून त्यानं आतील बर्फनं भरलेल्या स्टायरोफोम् कंटेनर मधील एक शॅम्पेनची बाटली व दोन ग्लास काढले.

ते तो हजारेकडं घेऊन आला.

"शॅम्पेन?" म्हणत हजारेनं तोंड वाकडं केलं.

"का? आवडत नाही?" मिस्टर वाघनं विचारलं,

"मोवेट्ट अँड् शेंडॉन! बेस्ट इन द वर्ल्ड्! एडिशन, डॉम पेरिनीऑन्  चार्ल्स अँड डायना नाइंटिन सिक्सटीवन. चार हजार सातशे शान्नव यूएसडी! जून दोन हजार एकोणीसच्या डॉलर रेट नुसार अराऊंड तीन लाख पस्तीस हजार सातशे वीस रुपये!

"खास तुमच्यासाठी आणली आहे. पण ठिकाय! आवडत नसेल, तर फोर्स नाही करणार!" मिस्टर वाघ त्याला म्हणाला.

"तुम्ही आग्रह करताय तर घेतो थोडी." हजारे संकोचत म्हणाला.

"ये हुई ना बात!" म्हणत खूष होऊन लगबगीनं मिस्टर वाघनं बाटली फोडली.

"ग्लव्ह्ज् का घातलेत?" हजारेनं विचारलं.

"शॅम्पेन थंड आहे ना..." मिस्टर वाघनं हजारेचं शंका निरसन केलं.

आणि त्यानं ग्लास भरून हजारेच्या हातात दिला.

ग्लास घेत हजारे,

"त्या डॅनियलच्या शॉपवर पण छान क्वॉलिटीची शॅम्पेन मिळते म्हणे. मी बिअर तिथंच घेतो." म्हणत हजारेनं मिस्टर वाघ कडून ग्लास घेतला आणि तोंडाला लावला.

"माहिती आहे. ही बाटली तिथूनच आणली आहे..."

हजारेनं घोट घेतला,

"तुमच्या नांवावर!" मिस्टर वाघनं वाक्य पूर्ण केलं.

तसा हजारेला ठसका लागला. आणि शॅम्पेन फवाऱ्या सारखी सगळीकडं उडाली...

"अहो शिस्तीत!" मिस्टर वाघ त्याला म्हणाला.

हजारेच्या नाकातूनही काही थेंब खाली आले. थोडावेळ स्वतःला सावरून तो मोठ्यानं हसू लागला...

"तुमचा काही नेम नाही!" तो हसत म्हणाला,

"मला वाटायचं मीच एकटा सर्वांत मोठा नीच आहे! पण तुम्ही माझ्यापेक्षाही काकणभर ज्यादाच निघालात!"

"तुम्हाला कळलं हे बरं झालं!" मिस्टर वाघ पण हसत म्हणला.

आणि त्यानं तिरकं पाहत ग्लास ओठांना लावला. हजारेनंही त्याचा ग्लास रिकामा केला. मिस्टर वाघनं पुन्हा तो भरत विचारलं,

"मी तुमची सर्व्हिस पिस्टल बघू शकतो? मला गन्समध्ये खूप इंटरेस्ट आहे!"

"एका अटीवर!" हजारे म्हणला.

"बोला."

"माझ्याबद्दलचे पुरावे तुम्ही नष्ट कराल!"

"हो. का नाही?!"

मिस्टर वाघनं सहमती दाखवल्यावर हजारेनं त्याची पिस्टल मिस्टर वाघसमोर धरली,

" 'ऑटो नाईन एमएम वन ए' मेड इन नाइंटिन एटीवन. इंडियन मेड सेमी ऑटोमॅटिक. थर्टीन राऊंड. नाईन एमएम कॅलिबर." मिस्टर वाघकडं ती देत हजारे म्हणाला.

मिस्टर वाघनं ती लोड केली.

"चालवू नका. मला एका एका राऊंडचा रिपोर्ट द्यावा लागतो!" हजारे हसत म्हणाला.

"माहितेय! मी नाही चालवणार..." मिस्टर वाघही हसून म्हणत तो हजारेच्या गाडीत बेशुद्धावस्थेत पडलेल्या त्या व्यक्तीकडं गेला. हजारे त्याच्या मागून गेला.

"काय करताय काय?" अजूनही हजारे हसतच होता.

पण त्याचं हे हसू लवकरच गायब होणार होतं.

हजारेनं जेव्हा पाहिलं, तेव्हा मिस्टर वाघनं ती पिस्टल त्या बेशुद्ध व्यक्तीच्या हातात ठेवली होती.

हजारेच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले. तो गंभीर झाला.

"मिस्टर वाघ... हे... हे काय करताय!" म्हणत तो मागं मागं सरकू लागला.

पण त्याला पळून जाण्याचा संधी न देता मिस्टर वाघनं त्या व्यक्तीच्या बोटावर आपल्या बोटानं दाब देऊन ट्रिगर ओढला.

"हा चालवणार आहे!" मिस्टर वाघनं त्याचं वाक्य पूर्ण केलं.

गोळी निघाली; ती सरळ हजारेच्या छातीत घुसली. तोल जाऊन हजारे मागे कोसळला आणि त्याचं डोकं जमिनीवर जोरात आढळलं. त्यामुळं डोक्यातूनही रक्तस्राव चालू झाला.

मिस्टर वाघनं त्याच्याकडं लक्ष न देता त्याच्या हातून पडून फुटलेल्या शॅम्पेनच्या ग्लासचे तुकडे गोळा केले. त्याच्यावर इंप्लान्ट केलेले सगळी डिव्हाइसेस काढून घेतली. शॅम्पेनची बाटली, त्याचा स्वतःचा ग्लास सगळं काही स्वतःच्या गाडीत ठेवले. हजारेची पिस्टल पण रिकाम्या होलस्टरला खोचली.

आणि त्याच सोबत त्या बेशुद्ध व्यक्तीला सुद्धा त्यानं त्याच्या गाडीत हलवलं. तिथले पुरावे नष्ट करून तो त्याच्या घराकडं निघाला...

# १०.

"मला वाटलेलं तुम्ही शॅम्पेन पाजून हजारेला मारताय...!" मी सुन्न होऊन बोललो.

"वेडायस की काय? एवढी महाग शॅम्पेन मात्री कोण करणार? बिसाईड्स, आय नेव्हर युज माय ट्रिक ट्वाईस! पकडलं जाण्याची शक्यता असते!"

मला माहितीय मिस्टर वाघ पित नाही. पण मला चिडवण्यासाठी तो उपहासानं तसं म्हणायला होता...

"हजारेचा खून झालाय म्हंटल्यावर इन्वेस्टीगेशन झालं असेल?"

"हो."

"मग तुम्ही वाचला कसे?"

यावर तो हसला.

"तुझ्या लक्षात आलं असेल, तर याचं उत्तर दिलंय मी तुला." तो म्हणाला.

"बरं. पण त्याचे अकाऊंट स्टेटस तपासलं असेलच. त्यांनी मरणाआधी तुम्हाला एवढी मोठी अमाऊंट ट्रान्जॅक्ट केल्याचं समोर आलं असेल..."

"तो असले ट्रान्जॅक्शन्स करण्यासाठी त्याच्या बायकोचं अकाऊंट वापरायचा. ती एका श्रीमंत घरातली मुलगी आहे. त्यामुळं मोठी रक्कम तिच्या अकाऊंटवर पडूनच असायची. तिचे वडील देखील ते अकाऊंट वापरतात त्यामुळं मोठं ट्रान्जॅक्शन्स पहिल्यापासून तिच्या अकाऊंट वरून होत आलंय. त्यामुळं कोणी कधी चौकशी केली, तरी ऑब्जेक्शन घेण्याचा प्रश्नच येणार नाही. शिवाय त्याच्या बायकोचं अकाऊंट व्हेरिफाय करायला सहसा कोणी जाणार नाही याची त्याला खात्री असावी." मिस्टर वाघनं माझी शंका दूर केली व तो कळकळीनं पुढं म्हणाला,

"वाईट या गोष्टीचं वाटतंय, की हजारेची बायको त्याच्या पापात सहभागी होती. मला जेवू घातलं होतं त्या माऊलीनं..."

"पण तरी तुमच्या अकाऊंट वर..." माझी शंका अजून दूर झाली नव्हती.

"तो ऑनलाईन ट्रान्जॅक्शन्स करतोय हे बघून मी त्याला माझे पर्सनल अकाऊंट डिटेल्स न देता माझ्याच एका सेवाभावी संस्थेच्या अकाऊंट वर त्याला ते पैसे ट्रान्स्फर करायला लावलं."

"तुमच्याकडं सगळया प्रश्नांची उत्तरं असतात नाही...!" मी तोंड वाकडं करून म्हणालो.

"मी अडकण्याची तुझी इच्छा कधीच पूर्ण होणार नाही सूरज!" तो हसत म्हणाला.

मिस्टर वाघ घराकडं ड्राईव्ह करत असताना त्याला त्याच्या स्क्रिनच्या जीपीएस ट्रेकिंग वरील पॉईंट हाललेला दिसला. आणि गंभीर होण्याऐवजी त्याच्या चेहऱ्यावर स्मित उमटलं.

आणि त्यानं गाडी वळवली ती मिथिलच्या घराकडं!

कुणाची परवानगी न घेता मिस्टर वाघ त्या व्यक्तीला घेऊन मिथिलच्या घरात शिरला. ती व्यक्ती समोर असल्यानं मिस्टर वाघला पण कोणी अडवलं नाही. फक्त वायरलेस वरून आत इंफॉर्म केलं गेलं.

व्हिएक्सचा होणारा परिणाम थांबण्यासाठी मिथिल स्वतःची ट्रीटमेंट करत बसला होता. त्यानं अगदी कुलली समोर उभारलेल्या मिस्टर वाघकडं बघितलं,

"आह! मिस्टर वाघ! मी तुमच्याकडं येणारच होतो!" म्हणत त्यानं मिस्टर वाघचं कॅमेरा डिव्हाइस त्यानं समोरच्या टी-पॉयवर टाकलं. म्हणाला,

"हे कोणीतरी माझ्या कारला चिकटवलं होतं!" मिथिल म्हणाला.

"प्रयत्न चांगला होता, पण फसला. काय?" मिथिलनं कसल्या तरी व्हाईल मधून सिरेंज भरत मिस्टर वाघला विचारलं!

"तुमचा माणूस!" मिस्टर वाघनं त्या व्यक्तीला त्याच्यासमोर फेकलं.

"मर्डर वेपन म्हणून याचा वापर करायचा प्लॅन होता तुमचा. तुमचे बोर्ड मेंबर्स आदिनाथ, शीतल, नारायण, सबइन्स्पेक्टर कैरव, जर्नलिस्ट उपेंद्र आणि पोलीस प्रोसिक्युटर रजत, आणि दोन सामान्य नागरिक करन आणि बिलाल, जे वस्तुतः सामाजिक व आरटीआय कार्यकर्ते; सगळे तुमच्या विरुद्ध पुरावे गोळा करणारे. या सगळयांना तुम्ही मारलंत." मिस्टर वाघनं त्या व्यक्तीकडं बोट केलं,

"याचा वापर करून!"

"म्हातारी माणसं ओ! आपल्या तरुणांच्या नवीन कल्पना त्यांच्या पचनीच पडत नाहीत! काही करायला जावं, तर फक्त आडवं लावायचं एवढंच त्यांना माहीत असतं. प्रगती करायची असेल, तर पहिला यांना निवृत्ती द्यायला हवी!" मिथिल म्हणाला.

"हो! मग त्यासाठी त्यांचा जीव घ्यावा लागला, तरी चालेल. होय की नाही?" मिस्टर वाघ गूढ स्मित ओठांवर घेऊन डोळे बारीक करून मिथिलला म्हणाला,

"तुम्ही तुमच्या बोर्ड मेंबर्सना मारण्याचा सपाटा लावलात! सुरवात केलीस कंपनीचे फाऊंडर असलेल्या तुझ्या वडलांपासून. तू त्यांना मारून गडबडीनं दहन पण करून टाकलंस. आणि नंतर याला हाताशी धरून तुझ्या मार्गात आडवं येणाऱ्या लोकांना संपवण्याच्या मार्गाला लागलास.

"बोर्ड मेंबर्स मेल्यानंतर तू नवे बोर्ड ऑफ डिरेक्टर्स इलेक्ट करणार होतास. जे तुझ्या तालावर नाचतील. या खूनांच्या तपासात जे-जे तुझ्या जवळ पोहोचले, त्या सगळयांनाही तू चोरीच्या

गाड्या वापरून याच्या सहाय्यानं संपवलंस! भविष्यात गोष्टी हाताबाहेर गेल्या असत्या, तर याला बळीचा बकरा केला असतात तुम्ही! हो की नाही?!

"पण तुमचा उतावळेपणा नडला तुम्हाला मिथिल साहेब! आणि तुम्ही स्वतःच खून पाडलेत! काय?" मिस्टर वाघनं हसून समोर बसत मिथिलला प्रतिप्रश्न केला.

"दिनेशलाही मारलंत तुम्ही! आणि दोन तासांपूर्वी निशांत अँड फॅमिली पण स्वर्गवासी झाली!"

"तुम्हाला तर सगळंच माहीत आहे! याचा अर्थ माहितेय?" मिथिलनं विचारलं,

"आता मरावं लागेल!" तो मिस्टर वाघला म्हणाला.

"हो! पण तुम्हाला!" मिस्टर वाघ हे बोलताच समोर पडलेली व्यक्ती अचानक उठली आणि त्याने मिलींद हजारेच्या पिस्टलनं मिथिलवर गोळी झाडली.

हेड शॉट! मिथिल जागीच गतप्राण झाला!

गोळी चालवलेला आवाज घुमल्यावर लगेच मिथिलची माणसं मिस्टर वाघ व त्या व्यक्ती भोवती गोळा झाली.

"आम्हाला मारून तुम्हाला काहीच मिळणार नाही! तुमचे खिसे भरणारा कधीच मरून पडलाय!" मिस्टर वाघ शांतपणे जागा न सोडता म्हणाला.

ती माणसं जागी तशीच उभी राहिलीत. ती बेसावध झाल्याचं पाहून ती संधी साधून मिस्टर वाघनं टी-पॉयवर पडलेली मिथिलची पिस्टल घेऊन त्यांच्यावर फायर केलं. त्याच्या हाताला ग्लव्ह्ज् अजून तसेच होते. त्या माणसानंही त्यांतील काही लोकांवर गोळ्या झाडून त्यांना संपवलं.

सगळं शांत झाल्यावर मिस्टर वाघनं मिथिल भरत असलेली सिरेंज व व्हाईल पहिली. तो हसला.

"काय होतं ते?" मी विचारलं.

"डायझेपाम" मिस्टर वाघनं उत्तर दिलं.

"डायझेपाम? पण त्यानं तर झोप येते ना?" मी गोंधळून विचारलं.

कारण मिस्टर वाघ समोर असताना अशी रिस्क घेण्याची हिंमत कोण करेल? आणि जो करेल, तो एक तर मूर्ख असला पाहिजे, नाही तर भयंकर धाडसी...!

"ओव्हर कॉन्फिडन्स! त्याच्या टेरिट्रीत होतो मी. म्हणून त्यानं फाजील धाडस केलं असेल. मला पटकन मारून आराम करायची इच्छा असावी त्याची. हं! पण मी कायमचाच आराम दिला त्याला!"

ती व्यक्ती मिस्टर वाघच्या बाजूला बसली. दम खात... मिस्टर वाघ मागं टेकला आणि त्यानं त्या व्यक्तीकडं पाहत त्याला विचारलं,

"मग सिदात! काही सांगायचंय?"

"सिदात! म्हणजे तो माणूस सिदात होता? जर तो मिथिलचा माणूस होता, तर त्यानं... मग त्यानं तुम्हाला मदत का केली?" माझा गोंधळ उडाला होता.

"पण सगळ्यात आधी; मिथिल त्या विषारी व्हिएक्स नर्व एजन्ट पासून वाचलाच कसा?" मी प्रश्न बदलला.

"मिथिल जर ते बनवू शकता होता, तर त्या पासून स्वतःच रक्षण कसं करायचं हे त्याला माहित असणारच! नाही?" मिस्टर वाघनं नेहमीच्या सवयीनं मलाच प्रतिप्रश्न केला.

मी होकारार्थी मान हलवली.

"डायझेपाम तो त्यासाठीच घेत होता. ते एक सेडेटीव्ह आहे. रिलॅक्सेशनसाठी हे युज करतात. म्हणूनच हे घेतल्यावर घेरी आल्या सारखं होतं आणि झोप लागते. एंझाईटी, अल्कोहोल विड्रॉव्हल व मसल स्पॅजम्स वर हा एक इलाज आहे." असं म्हणून त्यानं स्पष्टिकरण देणं चालू केलं,

"मी सिदातला घेऊन त्याच्या लिविंगरूममध्ये पोहोचलो, तेव्हा त्याच्या बाजूला एक पोर्टेबल ऑक्सिजन सिलेंडर पडलं होतं. यावरून तुला कळालं असेल, की त्यानं काय केलं असेल!"

मिस्टर वाघनं एक क्लिप त्याच्या टीव्ही स्क्रिनवर चालू केली.

स्क्रिनवर मिथिलची तीच 'गोलमेज परिषद' दिसत होती...

"श्रीलंकन इस्टर्न बॉम्बिंग, ट्वेन्टी फस्ट ऑफ एप्रिल टू थाऊसंड् नाइंटिन. चर्चेस अँड हॉटेल्स वेअर अटॅक्ड् बाय सुईसाईड बॉम्बर्स! वी वॉन्ट टू अवेंज फॉर दॅट!" त्यांतील एक व्यक्ती म्हणाली,

"लूक इट माय फादर, ही इज सफरिंग फ्रॉम हार्ड प्रॉब्लेम. लास्ट स्टेज! वी लॉस्ट आवर फॅमिली इन दॅट एक्सप्लोजन! इन हिस थिस कन्डीशन, ही हॅड सीन हिस फॅमिली डाईंग..."

"अँड वी अस्युम दॅट सम इंडियन्स अल्सो वेअर इनवॉल्व्ड् इन दॅट कॉन्सिरसी! वी वॉन्ट टू युज थिस केमिकल बॉम्ब इन इंडिया फस्ट! डुइंग दॅट, वी कॅन टेस्ट द बॉम्ब अँड अफ्टर् दॅट, वी विल हेडिंग टू इराक, श्रीलंका अँड दि रिअल मास्टर माईन्ड्स हू वेअर बिहाईंड दिज एक्सप्लोजन्स्!

"लूक, आय वॉन्ट टू गिफ्ट थिस रिवेंज टू माय फादर बिफोर् हिस डेथ. सो आय अस्युम दॅट यू आर रियलाईजिंग आवर अर्जन्सी!"

"नो प्रॉब्लेम. वी आर ऑल प्रिपेयर्ड्!" मिथिलनं त्याला आश्वासन दिलं.

त्यांचं संभाषण चालू असतानाच बाहेरून गोळी झाडलेला हलकासा आवाज झाला. सगळे सावध झाले. नकळतच चपळाईनं आपापल्या गन्स सगळयांच्या हातात आल्या होत्या. टिनचं काही तरी पडल्याचा पुन्हा आवाज झाला. थोड्याच वेळात आत गॅस पसरला. मिथिलला त्या गॅस बद्दल माहिती असल्यानं ते काय आहे हे लगेच त्याच्या लक्षात आलं आणि...

तो त्या ऑक्सिजन मास्क लावलेल्या माणसाकडं धावला. त्यानं त्याचा ऑक्सिजन मास्क व सिलेंडर हिसकावून घेतले. त्याच्या सोबतच्या माणसानं त्याला अडवण्याचा प्रयत्न केला. पण मिथिलनं त्याच्या पिस्टलनं त्याला बिझनेस ऑफर दिलेल्या माणसालाच गोळी झाडून जखमी केलं. हे हे दर्शवण्यासाठी होतं, की तो त्या वृद्धाला मारण्यास संकोच करणार नाही. मग मिथिलनं त्या आजारी माणसालाच हॉस्टेज म्हणून बरोबर घेतलं. त्याच्या कनपट्टीला त्याची पिस्टल लावली. त्यामुळं तिथल्या लोकांच्याकडं पण आर्म्स असून व ती मिथिलवर रोखली गेलेली असली तरी ते काही करू शकले नाहीत....

मिथिलनं त्याच्या तोंडाला एव्हाना ऑक्सिजन मास्क लावला होता. तो त्या आजारी वृद्ध माणसाला फरपटत खोलीतील दुसऱ्या बाजूच्या दरवाजाकडं पळाला. मिस्टर वाघचा टायनी कॅमेरा त्याला फॉलो करत होता.

मिथिल त्या बिल्डिंगच्या मागच्या बाजूने दरवाजा तोडून बाहेर पडला. मिस्टर वाघनं तोही लॉक करण्याची दक्षता घेतली होती. पण मिथिलनं गोळी झाडून त्याचं लॉक तोडलं होतं आणि त्या माणसाला तिथंच टाकून फक्त ऑक्सिजन सिलेंडर घेऊन तो तेथून पळाला होता.

त्याच्या गाडीत त्यानं डॅशबोर्डमधून कसलं तरी व्हाईल आणि सिरेंज काढून त्यानं स्वतःला इंजेक्ट करून घेतलं. थोडावेळ मागं टेकून बसला आणि काही वेळाच्या आरामा नंतर त्यानं गाडी चालू केली...

(म्हणून त्याची गाडी मूव्ह झालेली मिस्टर वाघाला त्याच्या गाडीच्या स्क्रिनवर दिसली होती...)

त्या पडायला आलेल्या बिल्डिंगमध्ये ती माणसं 'व्हिएक्स'मुळं मृत झाली होती... ती बातमी पाहिल्याचं आत्ता मला आठवलं... जी मी विसरून गेलो होतो... एनआयए अजूनही त्याचा तपास करत आहे...

टीव्ही स्क्रिन ब्लू झाली होती. जे पाहिलं ते खूप विचलित करणारं होतं. कोणाला तर अशा प्रकारे मरताना मी पहिल्यांदाच पाहत होतो...

मिस्टर वाघ तर क्रूर आहेच, पण मिथिल पण काही कमी नव्हता!

पण दोघांची बरोबरी मात्र होऊ शकत नाही. मिस्टर वाघ काही मिथिलसारखा स्वार्थी नाही! आणि हा मिथिल मिस्टर वाघसारखा संयमी नाही!

"व्हिएक्सला प्रिव्हेन्ट करण्यासाठी 'एट्रोपीन' हे अँटिडोट आहे! हे केमिकलची एक्शन ब्लॉक करतं व हृदयाला उत्तेजित करतं आणि नाक, तोंड व फुफ्फुस यांच्यातील स्राव कमी करून

श्वसनक्रिया सुधारण्यास मदत करत. एट्रोपीन सोबत 'प्रॅलिडोक्सिम' दिलं जातं. जे विषामुळं किंवा नर्व एजंटमुळं होणाऱ्या मसल विकनेसन व पॅरॅलीससला रिव्हर्स करत.

"गाडीत तेच त्यानं इंजेक्ट करून घेतलं होतं. तो व्हिएक्सवरच काम करत असल्यानं त्याचं अँटिडोट तो सोबत बाळगत असणार. त्यामुळं त्याच्याकडं सुरुवातीपासूनच अँटिडोट कसं अशी शंका बाळगण्यात काही अर्थ नाही!" मिस्टर वाघनं माझं शंका निरसन केलं आणि मी पुढं काय विचारणार हे आधीच ओळखून शेवटच्या वाक्यात त्याचंही उत्तर दिलं...

पण अजून काही प्रश्न होतेच... जसं की,

"मिथिल पुढच्या दरवाजानंच का नाही पळाला?" माझी बाळबोध शंका मी विचारली.

पण मला हे जाणून घ्यायचं होतं, की दरवाजा तोडूनच पळून जायचं होतं, तर तो समोरून का बाहेर पडला नाही...

"कदाचित मागील दरवाजा उघडा असेल म्हणून. पण मी शिकारीला पळायला जागा सोडत नाही हे त्याला माहित नव्हतं. तो दरवाजाही मी लॉक केला होता. दुसरं कारण हे असू शकतं, की मी समोर असेन म्हणून पण तो मागून पळाला असेल... मागच्या दारानं पळून मी समोर आहे का याची त्यानं खात्री करून घेतली असावी. मी नाही हे बघून तो गाडी घेऊन निघाला. त्यावेळी त्याला स्वतःला वाचवणं जास्त गरजेचं होतं. माझ्याशी त्यावेळी लढणं त्याला परवडणारं नाही. असा त्याचा विचार असावा.

"एवढं करूनही तो वाचला नाहीच...! त्या दिवशी त्याचं मरण अटळ होतं! मीच जे त्याचं नांव मृतांच्या यादीत कधीच टाकलं होतं!" तो कुत्सित हसत बोलला.

"आणि तुम्ही समोर असता, तर?" मी विचारलं.

"त्याच्याकडं गन होती! लपून त्यानं आधी मला मारलं असतं, आणि तो निघाला असता!" तो हे देखील थंडपणे म्हणाला!

'हा मरणाबद्दल किती सहज बोलतोय...' असा भाव माझ्या चेहऱ्यावर उमटला.

ते पाहून तो म्हणाला,

"काय? एक ना एक दिवस सगळ्यांनाच मरायचंय!" तो मनमोहक स्मित करत म्हणाला.

याला आता काय बोलावं हे मला कळेना... हा मृत्यू किती कॅज्युअल घेतोय... हो घेतोच! म्हणून तर कीटक मारल्यासारखी हा माणसं मारतो...

आता तर मी त्याला अमक्याला का नाही वाचवलं? असं विचारणंही बंद करायचं ठरवलंय. कारण तसं विचारलं, तर त्याचं उत्तर ठरलेलं असतं. तो म्हणतो,

"एव्हरी वन हॅस टू डाय सम डे! आय डोन्ट सेव पीपल. आय ओन्ली पनिश डिलिग्विन्ट्स!"

माझा काय विचार चालू आहे हे मिस्टर वाघाच्या लक्षात आलं असावं. तो हसला.

पण मी गंभीरच होतो.

"खरंच श्रीलंकेत जे झालं त्यात आपल्याकडील कुणाचा हात होता?" मी अत्यंत गंभीर होत विचारलं.

"फक्त एकाच नांव घेतलं जातंय. ते तुला माहीत असेलच. हल्लेखोरांवर त्याच्या इन्फ्लुएन्स आहे असं म्हंटलं जातंय. पण एक्सपोलजनमध्ये श्रीलंकेचेच लोक त्यात सामील होते. सात पुरुष आणि एक महिला सुसाईड बॉम्बर्स."

"पण आपणही या स्फोटात आपले अकरा नागरिक गमावलेत. हे आपण विसरता कामा नये! आपणही तितकेच अॅफेक्टेड आहोत, जितके श्रीलंकन नागरिक व इतर फॉरेनर्स ज्यांचं कोणी ना कोणी त्या हल्ल्यात मारलं गेलंय. हा माणुसकीवर झालेला हल्ला आहे. म्हणून सर्वच जण याच्याशी संबंधित आहेत!" तो याच्यावर पुढं काहीच बोलला नाही.

"या संदर्भात तुम्हाला कोणी अप्रोच झालं नाही?"

"नाही. श्रीलंकन ऑफिशियल्स यावर इन्वेस्टीगेशन करत होते. माझ्याकडून या संदर्भात कोणत्याही मदतीची मागणी कोणत्याच गव्हर्नमेंटनी केलेली नव्हती. आता तर श्रीलंकन प्रेसिडेंटनी याचा तपास थांबवण्यास त्यांच्या पोलिस चीफ व डिफेन्स सेक्रेटरीला सांगितलं आहे. इंटेलिजन्स फेल्युअर असल्यानं त्यांनी त्याच्या पोलीस चीफला सस्पेंड केलं आणि त्याच्या टॉप डिफेन्स ऑफिशियलला पण डिसमिस केलं."

"का?" मी विचारलं.

ही माहिती माझ्यासाठी खूप शॉकिंग होती. या प्रकरणाचा तपास झालेला त्याच्या प्रेसिडेंटनाच नकोय. पण का?

त्यावर मिस्टर वाघ म्हणाला,

"राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न असल्यानं त्यांचं तसं मत आहे. भारताकडून या संदर्भात आलेली इंटेलिजन्स इन्फॉर्मेशन त्यांच्या ऑफिशियल्स कडून त्यांच्यापर्यंत वेळेवर पोहोचवली गेली नाही अशी त्यांची तक्रार आहे. पण श्रीलंकन गव्हर्नमेंटने पीएसआय म्हणजे पार्लमेंट सिलेक्ट कमिटी अंतर्गत इन्वेस्टीगेशन जूनमध्ये पुन्हा चालू केलं आहे! त्यांच्या-त्यांच्यातच मतभेद चालू आहेत. इन्वेस्टीगेशनसाठी ही केस दुसऱ्या कोणाला देतील यात शंकाच आहे."

"म्हणजे तुम्ही यात काहीच करणार नाही?"

"जोपर्यंत माझ्यापर्यंत कोण येत नाही, तोपर्यंत तरी नाही!" त्यानं आपला निर्णय सुनावला. आणि पुढं म्हणाला,

"त्यात मी एक प्रायव्हेट इन्वेस्टीगेटर आणि शिवाय परदेशी. त्यामुळं मला ते कधीच अप्रोच होणार नाहीत! हा पण इस्लामिक स्टेटनं हल्ल्याची जबाबदारी घेतली असली, तरी श्रीलंकेचा मुख्य संशय तेथील लोकल इस्लामिक एक्स्ट्रीमिस्ट ग्रुप नॅशनल 'तौहीद जमात' व 'जमियातुल मिलातु इब्राहिम'वर आहे. श्रीलंकन ऑथिरीटीजनाच नाही वाटतं, की यामध्ये कोणी इंडियन सामील असेल."

"आणि ती लोकं कोण होती, जी भारतात व्हिएक्सचं एक्सप्लोजन घडवून आणणार होती?"

"ते कोणी प्रस्थापित टेररिस्ट्स नव्हते. पण ते जे काही करू इच्छित होते, ते मात्र अतिरेकी होतं. या घटनेचे सूत्रधार भारतीय, श्रीलंकन, इराकी, की आणखी कोणी? नक्की कोण हे त्यांना माहीतच नव्हतं. इस्लामिक स्टेट ऑर्गनायझेशन्स कडून क्लेम केले गेले असले, तरी खरंच त्या लोकांनी हल्ले घडवले का? हे स्पष्ट नव्हतं. जे काही कानावर पडत होतं, त्यावर ते आततायी ॲक्शन घेणार होते. या एका कारणासाठी त्या ठिकाणी मृत झालेल्या अमेरिकन निवासी विल्सन या फॅमिलीचे नातेवाईक एकत्र येऊन त्यांनी याचा बदला घेण्याचं ठरवलं होतं. त्यांचे काही फॅमिली मेंबर्स सुट्टीसाठी श्रीलंकेत आले होती."

"काय त्यांची इतकी मोठी ताकद होती, की ते हे घडवून आणू शकत होते?"

"हं!" मिस्टर वाघनं स्मित केलं. म्हणाला,

"जगातला जवळजवळ वीस पर्सेन्ट तेल व्यापार हे फॅमिली मेंबर्स मिळून कंट्रोल करतात. यावरून समजतं, की त्यांची ताकद काय असेल!"

"मग ते तसंही संबंधित देशांना गोत्यात आणू शकत होते, मग त्यांनी हा पर्याय डिस्ट्रक्शनचा पर्याय का निवडला?" मी प्रश्न केला.

"फॉरेन पॉलिसीज सूरज! खूप कॉम्प्लिकेटेड असतात! त्यांनी एकट्यानी निर्णय घेऊन काही झालं नसतं. त्यांच्या देशानं त्यांच्या पर्सनल इंटरेस्टसाठी त्यांना ते करू दिलं नसतं. म्हणून त्यांनी हा मार्ग निवडला असावा.

"पण ते शिक्षा करणार कोणाला? नेमकं टार्गेट माहीतच नव्हतं! म्हणून त्यांनी मास किलिंग करण्याचा निर्णय घेतला असावा असा माझा अंदाज आहे..."

"आणि म्हणून तुम्ही त्यांना मारलंत!" मी मिस्टर वाघला विचारलं.

"हो!" तो गंभीरपणे म्हणाला.

माझी चक्की गरम झाली होती.

"हे सगळं किती अमानवीय आहे..." मी विचलित होत म्हणालो.

यावर मिस्टर वाघ स्मित करत म्हणाला,

"मानवीय आहे सूरज! मानवीय आहे! हे सगळं माणसंच तर घडवून आणणार होते!"

आय डोन्ट सेव पीपल म्हणणाऱ्या मिस्टर वाघनं एवढ्या मोठ्या संकटातून असंख्य लोकांना वाचवलं होतं... आणि त्यानं असं करून पुन्हा माझ्या त्याच्या विषयीच्या समजाला छेद दिला होता...

"सिदातनं काय सांगितलं?" मी विचारलं.

हे सगळं पचवणं माझ्यासाठी अत्यंत अवघड जात होतं. अनामिक मृत्यू टळला होता... मिस्टर वाघमुळं... माहीतही नव्हतं, की मृत्यूच्या छायेत काही काळ काढलाय... मरण दारात उभं होतं... आणि... आणि कोणालाच त्याचा पत्ता देखील नव्हता...

या विचारानं माझ्या माथ्यावरून घामाचे काही थेंब ओघळले. थंडी असूनही... आजही बाहेर पाऊस चालू होता... माझ्या प्रश्नाचं उत्तर देण्याआधी मिस्टर वाघ काही काळ थांबला होता...

त्यावेळी पसरलेल्या शांततेत बाहेर पडणाऱ्या पावसाचा आवाज कानावर आला आणि पावसाचा जोर बाहेर वाढत आहे हे माझ्या लक्षात आलं.

आणि हेही लक्षात आलं, की मिस्टर वाघ मघाशी मला इतका हरवलेला का वाटत होता.

मिस्टर वाघनं जे काही सांगितलं, त्यामुळं वातावरणात कमालीचा तणाव निर्माण झाला होता आणि त्यामुळं एका भीतीचं जाळं माझ्या चहूबाजूनं पसरलं होतं...

मी मानसिक भीतीतून सावरलेलो नव्हतो. त्या लोकांना जे करायचं होतं तसं झालं असतं, तर?... घटना टळून देखील त्याबद्दल सतत न घडलेल्या घटनांबद्दल मेंदू चित्र तयार करत होता... मृतदेहाचे खचच खच माझ्या डोळ्यासमोर फिरू लागले...

पण पुढं काय झालं ते मला जाणून घ्यायचंच होतं. शिवाय या सगळ्यांशी हानिया कशी जोडली गेली आहे याचा उलगडाही अजून व्हायचा होता...

म्हणजे तसे तर सगळेच या प्रकरणाशी  जोडले गेले होते... पण हानिया डिरेक्ट्ली जोडली गेली होती, पण ती कशी...? हे देखील मला माहिती करून घ्यायचं होतं!

"आय वॉज वर्किंग इन यूएस मरीन्स एज वॉरन्ट ऑफिसर वन. आय एम अ इंडियन ओरिजिन अमेरिकन! टू थाऊसंड् वनला अमेरिकेनं अफगाणवर जेव्हा इन्वेजन केलं, अमेरिकन सोल्जर्स आणि अफगाण गव्हर्नमेंट ट्रुप तेव्हा तालिबान विरुद्ध तिथं लढत होते. आय वॉज दि पार्ट ऑफ दॅट अमेरिकन ट्रुप." सिदातनं मिस्टर वाघला सगळं सविस्तर सांगायला सुरुवात केली,

"युद्ध चालू असताना आम्ही करीम नांवाच्या एका अफगाण नागरिकाला पकडलं होतं. आमच्या लेफ्टनंटनं त्याच्या बहिणीला फिशिकली अब्युज करण्याचा प्रयत्न केलाय असा त्याचा आरोप होता. लेफ्टनंटचा खून करण्यासाठी तो बॅरेकमध्ये खुसला होता. फूड सप्लायचं काम त्याच्याकडं असल्यानं त्याला कॅम्पमध्ये एंटरन्स अलाव्ड् होता. म्हणून त्याला ते शक्य झालं होतं.

"पण लेफ्टनंटवर हल्ला करण्याआधीच तो पकडला गेला. त्याला इम्प्रिसंड् करण्यात आलं, पण त्याच्या बोलण्याचं व्हेरिफिकेशन पण केलं गेलं. आणि तो खरं बोलतोय हे समोर आलं. म्हणून मग लेफ्टनंटला अमेरिकेला परत पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. गेस त्याचं कोर्ट मार्शल करणार असावेत.

"अमेरिका व अफगाणमध्ये टेन्शन क्रिएट होऊ नये म्हणून हे प्रकरण दाबण्यात आलं. त्याच्या बाबतीत जी काही एक्शन घायची ती अमेरिकेत घेऊ असा विचार करून सिक लिव्हच्या रिजननं त्याला नॉर्मली अमेरिकेला रवाना करण्याचं ठरवलं गेलं.

"लेफ्टनंटला सेफ अँड साऊंड सिक्रेटली एअरबेसपर्यंत पोहोचवण्याचं काम माझ्यावर सोपवण्यात आलं होतं. जाताना लेफ्टनंटनं मला विनंती केली, की त्यानं जे काही केलंय त्याचा त्याला रिग्रेट आहे, त्यामुळं त्याला करीमच्या फॅमिलीकडं अपोलोजाईझ करायचंय.

"मी त्याची विनंती नाकारू शकलो नाही आणि त्याला करीमच्या घरी घेऊन गेलो. जेव्हा करीमच्या घरापाशी पोहोचलो, लेफ्टनंटनं मला बाहेर थांबण्यास सांगितलं आणि तो घरात शिरला.

"काही वेळानं आतून आवाज येऊ लागले. मी आत जाऊन पाहिलं, तर लेफ्टनंट करीमच्या बायकोला व त्याच्या बहिणीला मारत होता.

"ही वॉज युजिंग व्हेरी अब्युजीव लँग्वेज अगेंस्ट देम. मी लेफ्टनंटला अडवण्याचा प्रयत्न केला, पण त्यानं मलाच मागं ढकललं आणि माझी हँडगन हिसकावून घेऊन त्यानं त्या दोघींनाही शूट

केलं. मी शॉक्ड् झालो. आय... आय लॉस्ट माय माईंड फॉर अ व्हाईल... लेफ्टनंटचं असं वागणं माझ्यासाठी अनएक्सपेक्टेड् होतं...

"पण काही क्षणातच मी भानावर आलो कारण करीमची चार वर्षांची मुलगी समोर उभी होती. शी वॉज स्केअर्ड् टू डेथ! लेफ्टनंटची नजर तिच्यावर पडली होती. त्यानं तिच्यावरही गन पॉईंट केली.

"मी कसलाच विचार करू शकलो नाही. आय... आय स्नॅत्च्ड् माय गन फ्रॉम हिम अँड किल्ड् द लेफ्टनंट!"

एवढं बोलून तो दमल्यासारखा श्वासोच्छ्वास करत पडून राहिला.

"पुढं!" मिस्टर वाघनं त्याला सांगण्यास उद्युक्त केलं.

"घरात शोधाशोध करून तिथले हाताला लागतील तिवढे पैसे घेतले आणि त्या मुलीला घेऊन तेथून पळून गेलो."

"एव्हना माझ्यासाठी व लेफ्टनंटसाठी आमच्या मरीन्सची शोधाशोध चालू केली होती. पण तिथल्या करीमच्या नेबर्सनी मला तेथून निघण्यास मदत केली...

"मी कसा बसा इथं भारतात पोहोचलो. अफगाणी सोल्जर्स सोबत काम केल्यानं मुस्लिम कल्चर ओळखीचं झालं होतं. कलर पण ब्राऊन असल्यानं व मी मुस्लिम असल्याचं प्रिटेंड केल्यानं मधल्या देशांमध्ये मला काही प्रॉब्लेम आला नाही."

"तू इथं स्थायिक कसा झालास?"

"करीम सोबत काम करणाऱ्या काही व्हेजिटेबल एक्स्पोर्टर्स सोबत मी इंडियात आलो. इथं आल्यावर मी स्वतःचं नांव बदललं. आणि फेक रेसिडेंसी अँड आयडेंटिटी पेपर्स तयार केले. दॅट्स नॉट व्हेरी डिफिकल्ट. यू नो दॅट!

"आणि इथं मिळेल ते काम चालू केलं. तिकडं व्हर्जिनियामध्ये माझ्या लेफ्टनंटला मारून पळून जाण्यानं माझ्या फॅमिलीला खूप हॅसल सहन करावं लागत होतं. पण त्या मुलीची जबाबदारी आता माझ्यावर असल्यानं मी परत जाऊ शकत नव्हतो... काही महिन्यांत, वर्षांत माझी फॅमिली तर मेबी इन्कवायरीतून सुटली असती, पण हानियाला मी कुठं सोडणार होतो? सोडली असती, तर काय झालं असतं तिचं? म्हणून मी तिच्यासोबतच राहण्याचा निर्णय घेतला..." त्यानं श्वास सोडला व पुढं म्हणला,

"ज्या मुलीला मी अफगाण वरून घेऊन आलो, ती हानिया! करीमची मुलगी!..."

म्हणजे हानिया ही अशा प्रकारे या सगळ्या प्रकरणाशी जोडली गेलेली होती तर...

किती भोगलंय तिनं. तरी ती किती लाईव्हली आहे. तिचं नांव येताच मोहक स्मित करणारा हॉस्पिटल मधला तिचा चेहरा माझ्या डोळ्यासमोर उभा राहिला. नो वंडर, की मिस्टर वाघ तिला 'ब्रेव गर्ल' म्हणतो...!

"यू आर ए गुड मॅन सिदात! यू सॅक्रिफाईज्ड् युअर होल लाईफ फॉर दॅट अन्नोन लिटल गर्ल! यू रिअली आर अ ग्रेट मॅन!" मिस्टर वाघ सिदात म्हणाला. जे खरंच खूप खरं होतं...

"मिथिलशी कसा संपर्क झाला?" मिस्टर वाघनं त्याला पुढं विचारलं.

"अफगाणिस्तान ते भारत या जर्नीत हानियाच्या डिसऑर्डर बद्दल समजलं होतं. तरी कसं तरी सावरत मी तिला इथं घेऊन आलो होतो.

"इथल्या कामात मिळणाऱ्या पैशांतून तीची ट्रीटमेंट करणं आणि दोघांचा जगण्याचा खर्च करणं माझ्यासाठी इम्पॉसिबल होतं. म्हणून वर्षभरात मी धन्वंतरी फर्माचे फाऊंडर व त्यावेळचे एमडी अदीप भारद्वाज यांना भेटलो. त्यांच्या चॅरिटेबल ट्रस्ट बद्दल मी ऐकलं होतं. त्यांना

हानियाची अवस्था सांगितली. ही व्हॉज रिअली अ गुड मॅन. अफ्टर् हिअरिंग हानियाज् प्रॉब्लेम, ही गेव मी अ जॉब विथ गुड सॅलरी अँड अल्सो ही स्टार्टेड् हानियाज् ट्रीटमेंट. फ्यू मंथ्स बिफोर्, अफ्टर् हिस सडन डिमाईस, एव्हरी थिंग वॉज कोलॅप्स्ड्!

"बट वन डे, मिथिल कॉल्ड् मी. आय व्हॉज वर्कींग एज ए जॅनिटर इन धन्वंतरी फार्मा. दॅट्स वाय हानियाज् ट्रीटमेंट्स प्रोब्लेम ऑक्यूअर्ड अगेन. आय हॅड नो मनी फॉर हर मेडिकेशन. आणि हे मिथिलला माहीत होतं. त्यानं माझ्यासमोर एक प्रपोसल ठेवलं. बोर्ड मेंबर्सना मारण्याचं.

"त्यानं माझी सगळी हिस्ट्री जाणून घेतली होती. मी जर त्याचं काम केलं नाही, तर तो ही माहिती इंडियन व अमेरिकन गव्हर्नमेंटला सेंड करेल असं त्यानं मला थ्रेट केलं. तसं जर झालं असतं, तर मला काहीच प्रॉब्लेम नव्हता, पण हानिया एकटी पडली असती. शिवाय तिचा आजार... मेली असती ती...

"मी जर त्याला मदत केली, तर तो हानियाच्या ट्रीटमेंटसाठी खर्च करेल व तिची काळजी घेईल असं त्यानं मला प्रॉमिस केलं. मग... हा... आय वॉज हेल्पलेस... आय हॅड टू जॉईन हिम... आय हॅड टू जॉईन हिम फॉर हानिया...

"मी त्याच्या कामाला रेडी असून मी कधी त्याच्या अगेंस्ट जावू नये, त्याचा प्लॅन रुईन करू नये, म्हणून मला तो ड्रग्स इंजेक्ट करत होता. मी त्याच्यासाठी लोकांचे मर्डर्स करणार होतो आणि त्या बदल्यात मिथिल हानियाच्या ट्रिटमेंटची सगळी काळजी घेणार होता.

"माझ्याकडं पर्याय नव्हता. मी तयार झालो. आणि त्यानं त्याचं सायकियॅटिक ड्रग माझ्यावर टेस्ट करायला चालू केलं. त्यामुळं मला पॅरानोईया व एंझायटी फील व्हायची... डिझिनेस जाणवायचा. अफगाणमध्ये घडलेल्या घटना समोर जशाच्या तशा उभ्या रहायच्या... एवढं जाणवतंय... इन बिटविन मी काय करायचो; त्या वेळी मला लक्षात रहायचं नाही... पण नंतर ते सगळं मला हाउंट करायचं..."

"तू तुझा ल्युटेनेन्ट समजून खूप माणसं मारलीस!" मिस्टर वाघ म्हणाला.

"सॉरी फॉर दॅट! आय रिअली डिडन्ट इंटेन्ड टू डू दॅट...!" सिदात पुढं म्हणाला,

"पण त्या ड्रगचा इफेक्ट उतरल्यावर पण मला सायकॉलॉजिकल प्रॉब्लेम्स व्हायचे... खूप जोरात हेडएक व्हायचं..."

"आय नो! सतत ड्रग डोस मिळत राहील्यानं तसं होत होतं." मिस्टर वाघ एवढंच म्हणाला.

"बट थँक्स टू यू! यू सेव्ड् मी फ्रॉम दि हेल...!" सिदात मिस्टर वाघला कृतज्ञतेनं म्हणाला.

" नो . डोन्ट थँक मी!" मिस्टर वाघ पुढं काही बोलला नाही.

त्याच्या डोक्यात काय चालू होतं कोण जाणे...

"कॅन यू हेल्प मी फाईंड हानिया?" सिदातनं मिस्टर वाघला विनंती केली.

"तू शेफ पण आहेस का?" मिस्टर वाघनं मध्येच त्याला विचारलं.

विषय बदलण्यात तसा तो एक्सपर्ट आहेच.

"हो... म्हणजे सुरवातीचा काही काळ मी एका रेस्टॉरंटमध्ये पण काम केलं होतं. तिथं मी शिकलो होतो." सिदातनं सांगितलं.

"चक स्टेक तुझी स्पेशालिटी आहे!"

"हो. तुम्हाला..." सिदात विचारणार इतक्यात मिस्टर वाघ त्याला वाक्य पूर्ण करू न देता त्याला म्हणाला,

" शी मस्ट बी हिअर समवेअर! लेट्स गो फाईंड हर!"

मिस्टर वाघनं उठून मिथिलची गन त्याच्या एका रिकाम्या होलस्टरमध्ये खोचली. आणि सिदात कडून हजारेची पिस्टल घेऊन तो आतल्या बाजूला चालून गेला. सिदातनं ही हानियासाठी शोध चालू केला...

दोघांनी मिथिलचं घर धुंडाळलं. घरातील शेवटच्या खोलीत हानियाला ठेवण्यात आलं होतं. एक नर्स तिच्या देखभालीसाठी तिथं होती. बाहेरील बंदुकांच्या आवाजांमुळं ती गांगरली होती. पण त्या गोंधळाचा हानियावर काहीच फरक पडला नव्हता.

"ती तिथंच असेल हे तुम्हाला कसं ठाऊक? तुम्ही ते कसं ओळखलंत?" मी आश्चर्यानं विचारलं.

"सिदातला ब्लॅकमेल करण्यासाठी मिथिलला हानियाला सोबत ठेवणंच गरजेचं होतं. मग तो तिला त्याच्या घरीच ठेवणार हे ओळखणं अवघड नाही." तो सहज म्हणाला.

'एवढी साधी गोष्ट तुझ्या लक्षात ठेऊ नये?' असा त्याच्या बोलण्याचा टोन होता. जो माझ्या लक्षात आला.

मिस्टर वाघ व सिदातनं खोलीत प्रवेश करताच ती नर्स तेथून पळून गेली होती. ती इतकी घाबरलेली होती व गडबडीनं पळून गेली होती, की तिनं सिदात व मिस्टर वाघकडं पाहिलं देखील नव्हतं.

सिदातनं हानियाला आपल्या कवेत घेतलं. अश्रू आणि हानियाला भेटल्याचा आनंद या संमिश्र भावना त्याच्या चेहऱ्यावर उमटल्या होत्या. हानिया देखील सिदातला पाहून हसू लागली...

त्याचक्षणी मिस्टर वाघनं हजारेची सिदात कडून घेतलेली गन सिदातवर रोखली.

सुरवातीला सिदात आश्चर्यचकित झाला, पण नंतर कमालीचा शांत होत तो मिस्टर वाघला फक्त एवढंच म्हणाला,

"गो अहेड!"

तो हे बोलताच मिस्टर वाघनं ट्रिगर दाबला आणि सिदात हानियाच्या मिठीतच गतप्राण झाला. त्याच्या रक्ता-मांसाचे तुकडे सगळया बाजूना व हानियावरही विखुरले. मिस्टर वाघ देखील या पासून अछूता राहिला नाही...

आणि मग तो हजारेची गन तिथंच टाकून हानियाला घेऊन तेथून बाहेर पडला...

# ११. फायनल वर्डीक्ड् -

मिस्टर वाघनं मिथिलची ती 'मॉसबर्ग एमसी वन एससी' ही सबकॉपॅक्ट सेमी ऑटोमॅटिक नाईन एमएम पिस्टल माझ्यासमोर ठेवली. पण आज माझं त्या गनकडं लक्ष नव्हतं.

"सबकॉपॅक्ट सेमी ऑटोमॅटिक नाईन एमएम कॅलिबर! कपॅसिटी फ्लश-फिट मॅगझीनमध्ये सहा राऊंड व एक्सटेंडेड् मॅगझीनमध्ये सात राऊंड. लांबी सहा पॉईंट पंचवीस इंच. वजन सहाशे तेवीस पॉईंट सात ग्रॅम. फुल्ली लोडेड् अँड इसी टू रेग्युलर कॅरी. खूप कम्फर्टेबल आहे! " तो म्हणाला.

मी भयंकर धक्क्यात होतो. तो काय बोलतोय हे त्यावेळी माझ्या कानात गेलं फक्त पण डोक्यात शिरलं नाही...

मी विचार होतो, की मिस्टर वाघची प्रत्येक केस अधिकाधिक खतरनाक होत चालली आहे आणि मी त्याचा इच्छा नसताना एक अविभाज्य भाग होत आहे...

"म्हणजे हानियाला माहीत आहे, की तुम्ही तिच्या गार्डीयनचे खुनी आहात... आणि तरी तिनं तुमच्या वर विश्वास ठेवला?..."

"कारण सिदातच्या 'गो अहेड' म्हणण्यातून माझ्याविषयी त्यानं जो विश्वास दर्शवला होता, तो तिनं अनुभवला होता.

"सिदातला विश्वास वाटला होता, की तो मेल्यानंतर मी हानियाची काळजी घेईन म्हणूनच कोणत्याही चिंतेविना तो माझ्या हातून मरायला तयार झाला. त्याच्या हातून झालेल्या खूनांचं प्रायश्चित्त यातूनच होईल असं त्याला वाटलं होतं. आणि हीच त्याची इच्छा होती. म्हणून मला त्याला मारावं लागलं!"

'तुम्ही त्याला का मारलंत?' या माझ्या प्रश्नाचं उत्तर मिस्टर वाघनं मी न विचारताच मला दिलं होतं...

"तुमचा आणि त्याचा संवाद कधी झाला?" मी विचारलं.

"मिथिलच्या घरी येताना वाटेत. सिदातला ड्रग्स दिलं गेलंय हे स्पष्ट होतं. पण कोणतं, ते शोधून काढायला व त्यानुसार त्याला मेडिसीन्स द्यायला माझ्याकडं तेवढा वेळ नव्हता. म्हणून त्याला मी 'कॅफिन' हे ड्रग दिलं. हे सेंट्रल नर्व्हस सिस्टीमला उत्तेजित करत. मेंदूपर्यंत पोहोचल्यावर घेणाऱ्या व्यक्तीमध्ये अलर्टनेस येतो. व्यक्तीला अधिक जागृत होते आणि थकवा कमी होतो. म्हणून डोकेदुखी, आणि मायग्रेनचे उपचार करण्यासाठी औषधामध्ये कॅफिन हा एक कॉमन घटक आहे. कॅफिनचा परिणाम तासाभरात होऊ लागतो आणि तो तीन ते चार तास राहतो.

"त्यामुळं सिदात मिथिलच्या घरी येण्याच्या प्रवासातील तासाभरात शुद्धीवर आला. तेव्हा मी त्या पर्टीक्युलर वेळी मला गरजेची होती तेवढीच माहिती त्याच्याकडून जाणून घेतली होती आणि या दरम्यान तयार झालेला माझा प्लॅन मी त्याला सांगून हजारेची गन त्याला दिली होती.

"मरणाची इच्छा पण त्याचवेळी त्यानं बोलून दाखवली होती. अनेक हत्यांचं हे ओझं घेऊन तो या पुढं जगू शकणार नाही असं तो मला म्हणाला आणि त्यानं हानियाला इथून पुढं सांभाळण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली..." मिस्टर वाघ अत्यंत गंभीरपणे म्हणाला.

पण मला एक गोष्ट माहीत आहे, सिदातनं विनंती केली नसती, तरी मिस्टर वाघनं सिदातला मारलं असतं आणि हानियाची पण काळजी घेतलीच असती. जी तो घेतो आहे...

"मग जर खूनी एकच व तो सिदात होता, तर खून करण्याचे प्रकार वेगवेगळे कसे होते?" हा प्रश्न अजून माझा पिच्छा सोडत नव्हता. म्हणून मी मिस्टर वाघला तो विचारलाच!

"प्रत्येक वेळी सिदातला खून करण्यासाठी वेगवेगळी हत्यारं दिली जायची. सिदात पण एक्स मरीन असल्यानं तो तसा कोणतंही वेपन युज करण्यात एक्सपर्ट होताच. ड्रगच्या प्रभावाखाली असूनही वेपन्सनुसार  सिदात खून करायचा!"

पुन्हा एक प्रश्न होताच! तो म्हणजे,

"मिथिलनं सिदातला ऑफिसमध्येच ठेवलेला असून कोणत्याच बोर्ड मेंबरला आधी संशय नाही आला, की तो त्याचा वापर खून करण्यासाठी करतोय?"

"पोलिसांसाठी ट्रुथ सिरम बनवण्याच्या नावाखाली मिथिल सिदातवर ड्रग प्रयोग करत होता. त्याचे वडील अदीप भारद्वाज जिवंत असतानाच तो प्रस्ताव त्यानं बोर्ड मेंबर्स कडून सहमत करून घेतला होता.  अदीप यांच्यावर सगळ्याचा विश्वास असल्यानं कोणी आपत्ती दर्शवली नाही व तो प्रस्ताव पारीत करण्यात आला होता.

"त्यामुळं त्याचे सिदातवर ट्रुथ सिरमचे एक्सपरिमेंट्स चालू आहेत असं वाटून सगळ्यांनी सुरुवातीला दुर्लक्ष केलं. पण नंतर कॉन्फरन्समध्ये मिथिलनंच सत्य सगळ्यांसमोर रिव्हील केलं होतं ना!"

"पण सिदात हानियाला घेऊन इतर कुठं न जाता भारतातच का आला?" मला हा प्रश्न उद्विग्न करत होता.

कारण तो इथं आला नसता, त्याच्या सोबत असं काही घडलंच नसतं... या जर-तरच्या गोष्टी ना काही अर्थ नसतो. ते आपल्या हातातही नसतं. पण जेव्हा काही वाईट घडतं, तेव्हा असे प्रश्न मनात येणं स्वाभाविक आहे...

"इंडियन ओरिजन असल्यानंच नाही, तर भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. त्यामुळं तो हानिया सोबत भारतातच सेफ राहू शकेल असं त्याला वाटत होतं म्हणून!"

(त्याचं म्हणणं बरोबर होतं; पण आत्ताची ग्राऊंड रिएलिटी वेगळी आहे... हे सिदातच्या नंतर लक्षात आलं असणार... असो!)

हानियाची इथून पुढची सगळी देखभाल मिस्टर वाघ करत आहे...

आयुष्यात इतकं सगळं पाहून-भोगून हानिया किती तटस्थ आहे... अगदी मिस्टर वाघ सारखी...!

आयुष्याकडे बघण्याची सकारात्मकता तिनं अजूनही सोडलेली नाही. हे तिच्या वागण्यावरून आणि चेहऱ्यावरील त्या मोहक हसण्यानं मला पटवून दिलं होतं...

"पण मुळात तुम्ही सिदातला मारण्यापासून हजारेला अडवलंतच का? आणि नंतर तुम्ही त्याला कुठं घेऊन जात होतात?"

"त्याच्या हातून मला हजारेला मारायचा होता! मिथिलची सगळी माहिती पण मला काढून घ्यायची होती म्हणून त्यावेळचं त्याचं मरणं मी काही काळ पोस्टपोन केलं. पुढं तो मरणारच होता...!" मिस्टर वाघ थंडपणे म्हणाला.

पुन्हा काही काळ शांततेत गेला. आणि मग काही तरी आठवल्यासारखं अचानक बोलून मिस्टर वाघनं शांतता भंग केली.

म्हणाला,

"तुला माहिती आहे, नांव बदलताना सिदातनं करीमची मुलगी हिना हिला 'हानिया' हे नांव दिलं. हानिया म्हणजे हॅपी! आनंदी! नांवाप्रमाणे आहे ती नाही?! तिच्या नांवाला ती जागते!

"सिदातचं पण खरं नांव अथर्व होतं. ज्यावेळी त्यानं नांव बदलण्याचं ठरवलं, त्यावेळी 'सिदात' हे हानियानं त्याला नावं दिलं होतं, सिदात... म्हणजे 'लॉर्ड' किंवा 'परमेश्वर'! हानिया हा शब्द अथर्वसाठी 'देव' म्हणून वापरायची!

"हं! तिच्यासाठी तो देवच तर होता... पण काय करणार? देवालाही मरण चुकलेलं नाही..."

"तुम्ही हे सगळं कसं समअप करणार आहात?" मी अत्यंत थंडपणे मिस्टर वाघला विचारलं.

"हजारेला कुणी मारलं?"

"तुम्ही!"

"मित्च! कोणाच्या हातून?" त्यानं वैतागल्या सारखं विचारलं.

"सिदातच्या.

"राईट! आणि मिथिलला कोणी मारलं?"

"सिदातनं!"

"मग मी कुठं आडकतोय?"

"पण सिदातला तर तुम्ही मारलंत ना!" मी कळवळीनं म्हणालो.

"बट आय वॉज वेअरिंग हँडग्लव्ह्ज् आणि शिवाय मी हजारेचीच गन युज केली होती. सिदातवर पॉईंट ब्लँक फायर करून सिदातनं स्वतःला गोळी घालून आत्महत्या केली आहे असा सेटअप मी उभा केला."

"आणि ती नर्स?"

"ती कोणत्याच अडचणीत आपण अडकू नये म्हणून कधी या संदर्भात स्वतःहून तोंड नाही उघडणार. शिवाय घाबरून पळून जाताना तिनं नीट मला पाहिलंच कुठं होतं.

"दुसरं म्हणजे ती तिथं होती हे इतर कोणाला माहीत नाही. आणि ज्यांना माहीत होतं त्यातील हानिया सोडून कोणी जिवंत नाही. हानियापर्यंतही कोणी पोहोचणार नाही, कारण ती तिथं होती हे पण कोणाला माहीत नाही. आणि हानियापर्यंत कोणी पोहोचलंच, तर हानिया या संदर्भात कोणाला काही बोलणार नाही याची मला खात्री आहे. मग चौकशीसाठी त्या नर्सपर्यंत पोहोचणारच कोण? आणि कसं? असं काही व्हायचं असतं, तर आतापर्यंत झालं असतं. आणि काही झालंच, तर मी सांभाळेन. यू नो दॅट. सो डोन्ट वरी...!"

त्यानं मला आश्वासित केलं.

दुसऱ्या दिवशी मी हिंमत एकवटून हॉस्पिटलला हानियाला भेटायला गेलो... त्याही वेळी तिच्या चेहऱ्यावर तेच चैतन्यमय स्मित होत. गोड हसून तिनं मला अभिवादन केलं होतं. पण यावेळीही मी तिच्याशी काहीच बोललो नाही.

आईनं केलेल्या जेवणाचा डबा तिच्या बेडजवळच्या टेबलवर ठेवला आणि तिच्याकडं एक नजर पाहून मी बाहेर पडलो. तिची आणि माझी नजरानजर झाली, पण तिच्या नजरेला नजर देण्याची हिंमत माझ्याच्यानं झाली नाही. मी तिच्या वॉर्ड मधून बाहेर पडलो.

बाहेर मिस्टर वाघ भिंतीला टेकून हाताची घडी घालून उभा होता. मला बाहेर आलेलं पाहून तो सरळ उभा राहिला. त्याच्या चेहऱ्यावर हसू होतं.

"तुम्ही इथं...?" मी अडखळत विचारलं.

"मी इथं असण्याचं आश्चर्य नाही. पण तू इथं कसा?" मला हॉस्पिटल बाहेर घेत त्यानं विचारलं.

"लग्न करणार तिच्या सोबत?" त्यानं अनपेक्षित प्रश्न विचारला.

मी भांबावलोच! काय बोलावं मला सुचेना...

"म... मी...?" मी चपापत विचारलं...

त्यावर तो हसला,

"जस्ट किडींग! आय नो तुला तिच्याविषयी आदर आहे आणि म्हणूनच तुला तिची काळजी वाटत आहे. अदर् वाईज् तुझ्या मनात तिच्याविषयी काही नाही. मला तुझी स्थिती माहीत आहे. वी बोथ आर सेलिंग इन द सेम बोट सूरज! वी आर बोथ द सेम!"

तो नेहमी असं काही तरी बोलतो, पण त्याला नेमकं काय बोलायचं आहे ते मात्र त्यानं रीतसर लपवून ठेवलंय. तो त्याचा वर्तमान तर माझ्यासमोर उलगडतो, पण त्याचा भूतकाळ मात्र त्यानं लपवून ठेवलाय.

मिस्टर वाघ जरी असं म्हणत असला, तरी त्याचा एकटेपणा दूर करण्यासाठी त्याला मी हवा असतो. तो समुद्रासारखा आहे. सगळं काही समावून घेणारा, तरी आपली मर्यादा न लांघणारा. पण समुद्राचाही कधी तरी बांध फुटतोच; आणि तसा मिस्टर वाघची सहनशीलताही! म्हणून तर गोष्टी जेव्हा त्याला त्रास द्यायला लागतात, तेव्हा तो माझ्याकडं येतो. आपलं मन मोकळं करायला...

हं! तो मला त्याचा कन्फेक्शन बॉक्स म्हणतो...

मिस्टर वाघ मग समोर पाहत गंभीर होत मला पुढं म्हणाला,

"तुझं नांव खूप मार्मिक आहे. सूरज! माझ्या आयुष्यातला अंधार घालवतोस तू!"

पण माझ्या समोरील प्रश्न होता, की माझ्या आयुष्यातला अंधार कोण मिटवणार...?

एकटेपणा आम्हाला सहन होत नाही. किमान मला तरी...

पण स्त्री ही मानसिक दृष्ट्या कीती सबळ असते याची प्रचिती मी माझ्या आईच्या माध्यमातून खूपदा घेतली आहे... हानियाचं नवं व ताजं उदाहरण सुद्धा माझ्या डोळ्यासमोर आहेच...

खरंच! एकटं राहण्याचं धाडस एक स्त्रीच करू जाणे...

मिस्टर वाघ बोलतच होता...

मी मात्र स्तब्ध उभा होतो... भविष्यात अजून काय काय विचित्र व भयंकर पण तरीही जगाचं खरं रूप दाखवणाऱ्या घटना पहायला मिळणार आहेत हे आत्ताच समजणार नसून त्याचा भाबडा अंदाज घेत...

पण या विलक्षण घटनांनी एक गोष्ट माझ्या लक्षात आणून दिली, की...

**"ह्युमॅनिटी हॅज नो बॉण्ड्स ऑफ रिलीजन्स् अँड नॅशनॅलिटी; अँड रिलीजन्स् आर नॉट रेलेटेड टू टेररीजम्! एव्हरी थिंग इज् रिलेटेड् अँड रिव्हॉल्व्स अराऊंड टू दि पर्सनल इंटरेस्ट्स ओन्ली! अँड धिस इज द ट्रु वर्ल्ड् वी आर लिव्हिंग इन...!"**

**"मानवतेला धर्म व राष्ट्रीयत्वाच्या सीमा नाहीत; आणि दहशतवाद हा देखील धर्माशी संबंधित नाही! इथं प्रत्येक गोष्ट स्वार्था भोवती फिरते आहे! आणि हेच आपण रहात असलेल्या या जगाचं खरं रूप आहे!**

"आता?" मी मिस्टर वाघकडं पाहत त्याला विचारलं.

त्यावर त्यानं थंडपणे उत्तर दिलं,

"हजारेची बायको अजून जिवंत आहे!"

**समाप्त!**

## कसं वाटलं पुस्तक मित्रांनो?

फ़ुकट असलं तरी कसलं भारी आहे ना?

काही लोकांचा असा समज आहे की जे फ़ुकट मिळतं ते फ़ालतू असेल. पण तसं नसतं. आपल्याला आपले आईवडील मिळतात ना की ते आपण विकत घेतो? आणि त्यांचे संस्कार? आणि आपला देश आपलं राष्ट्रीयत्व? अगदी आपल्या आजूबाजूच्या हवेतला ऑक्सिजनही फ़ुकटच मिळतो ना. आणि हा मौल्यवान मनुष्यजन्मही फ़ुकटच मिळाला की आपल्याला!

तेव्हा मित्रांनो जे जे फ़ुकट ते ते फ़ालतू असा समज असलेल्या लोकांना एकदा ई साहित्यच्या साइटवर आणा. ई साहित्यची पुस्तकं वाचायला द्या. तुम्ही जे पेराल तेच उगवेल. जर तुम्ही समाजात चांगली मूल्यं पेराल तर तुम्हालाही या समाजात चांगली वागणूक मिळेल. समाज म्हणजे आपणच की. निदान आपल्या आजूबाजूचा समाज तरी मूल्यप्रधान करुया.

चला तर मित्रांनो, एक भव्य चळवळ उभारुया. यात प्रत्येकाने आपला सहभाग घेतला तर हा बाराकोटींचा महाराष्ट्र जगातला सर्वोत्कृष्ट अभिरुचीपूर्ण वाचकांचा प्रदेश बनायला वेळ लागणार नाही.

टीम ई साहित्य

esahity@gmail.com

www.esahity.com

**एक प्रसन्न अनुभव**